॥ श्रीसद्‌गुरु रामचंद्रायनमः ॥

साधनमार्गास धरून लिहिलेले

# श्रीहनुमद्‌गुरुचरित्र-बोध-सार

लेखक - श्रीमामामहाराज केळकर

सांगली

॥ श्रीसद्गुरु रामचंद्रायनमः ॥

## साधनमार्गास धरून लिहिलेले

# श्रीहनुमद्गुरुचरित्र-बोध-सार

लेखक - श्रीमामामहाराज केळकर
सांगली

प्रकाशक :- **सौ. अपर्णा अनिलप्रभू केळकर**

प्रकाशन स्थळ :- **८२७, श्रीबापूरावजी केळकरवाडा**
**गांवभाग, सांगली-४१६ ४१६.**

प्रकाशन दिनांक :- **१३-१२-१९९५**

आवृत्ती :- **द्वितीय**

मुद्रक :- **सतिश खंडेराव लोखंडे**
गजेंद्र प्रिंटींग प्रेस
७०५, पेठभाग, सांगली

[खाजगी वितरणासाठी]

|| ॐ ||

तीर्थरुप कै. राजाराम कृष्ण तथा बापूसाहेब पटवर्धन



नमो बापूराया नमो कृष्णभक्ता |
जेणे पाठ केला तुकाराम गाथा ||
नित कीर्तनी जो निमग्न झाला |
नमस्कार हा प्रेम भावे तयाला ||१||

श्रीदासराम

# कार्य कारण संबंध

माझे वडील ती.प.पू. राजाराम कृष्ण तथा बापूसाहेब पटवर्धन हे तसे जमखिंडीचे. पण माझे सासर सांगलीत असल्याने ते सेवानिवृत्तीनंतर सांगलीतच स्थायिक झाले. सांगलीत राहायला आल्यापासून त्यांनी आपला दिनक्रम आखून घेतला. जास्तीत जास्त काळ सत्संगतीमध्ये घालविणेचे ठरवून त्यादृष्टीने ते आमचे घरी सकाळ व संध्याकाळ होणाऱ्या नित्यक्रमात आनंदाने सहभागी होऊ लागले. श्रीराम मंदिरातील कोणतेही काम असो मग ते सतरंज्या झाडण्यापासून उत्सवात पंगती वाढण्यापर्यंत सर्व काम अत्यंत श्रध्देने करीत. अगदी अलिकडे ती. आण्णांच्या अनुपस्थितीत ती.प.पू. श्रीमामंजींच्या आज्ञेने कीर्तनात संतांची गोष्ट पण अत्यंत समरसतेने सांगत.

पण अचानक गेल्या वर्षी दिनांक २४।१२।९४ रोजी माझ्या वडिलांचे देहावसान झाले. आमच्यावर दुःखाचा डोंगरच कोसळला. त्यांचे देहावसान होऊन एक वर्ष पूर्ण होत आले आहे. यानिमित्ताने त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ माझे आजे सासरे ती. प. पू. श्रीमामामहाराज केळकर यांनी साधनमार्गास धरुन लिहिलेले भगवानश्रीसद्‌गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे ओवीबध्द चरित्र पुन्हा नव्याने प्रकाशित करावे असे वाटले व हा आमचा विचार आम्ही माझे मामंजी श्रीसद्‌गुरु श्रीदादामहाराज यांना सांगितला व त्यांनी लगेच त्यास अनुमती दिली.

आता पुस्तक छपाई म्हणजे प्रिंटिंग प्रेसचे कामच महत्वाचे. ते काम आमचे घरी नित्य उपासनेसाठी येणारे श्री.बाळासाहेब लोखंडे यांनी अत्यंत निष्ठेने केले. श्रीहनुमद्‌गुरुचरित्र बोधसार हा अत्यंत पवित्र प्रासादिक ग्रंथ पोथीच्या स्वरूपात व अत्यंत आकर्षकरीत्या पुर्नमुद्रित केला आहे. याबद्दल त्यांना धन्यवाद. भगवान श्रीसद्‌गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे रंगीत छायाचित्र प. पू. श्रीगुरुनाथमहाराज यांनी उपलब्ध करुन दिले. त्याबद्दल त्यांची मी अत्यंत ऋणी आहे. हा ग्रंथ पूर्ण होण्यास श्री.रेगोडकरकाका, छायाचित्रकार श्री.धामणीकर व श्री.गोखलेकाका यांचे मोलाचे सहकार्य झाले आहे. सर्वांचे आभार.

शेवटी ती. कै. बाबांना अभिवादन करुन माझ्या मनीचे हे चार शब्द भगवान श्रीसद्‌गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे पवित्र चरणी अर्पण करुन येथेच थांबते.

सांगली,
१३।१२।१९९५

सौ.अपर्णा अनिलप्रभू केळकर

||ॐ||

# मनोगत

आमचे व्याही श्री. राजाराम कृष्ण तथा बापूसाहेब पटवर्धन यांचे देहावसान होऊन एक वर्ष होत आले. श्री. बापूसाहेब पटवर्धन हे माझ्याशी व्याही याद्दष्टीने कधी वागलेच नाहीत. त्यामुळे ते मला बंधूंच्याप्रमाणे वाटत. श्री. बापूसाहेब अगर त्यांच्या पत्नी श्रीमती रजनीताई पटवर्धन यांची आमचे भगवान श्रीसद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, ती. प. पू. श्रीमामा, श्रीसद्गुरु श्रीगोंदवलेकर- महाराज, श्रीसद्गुरु श्रीब्रम्हानंद- महाराज यांचेबद्दल अपार श्रध्दा. त्यामुळे माझ्याशीही ते वेगळ्याद्दष्टीने वागत असत. ही सर्व वस्तुस्थिती लक्षात घेता श्री. बापूसाहेबांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त आमचे ती. प. पू. श्रीमामा यांनी साधन मार्गास धरुन जे श्रीतात्यासाहेबमहाराज यांचे चरित्र लिहिले आहे त्याच्या मुद्रित प्रती सर्व संपल्या आहेत. त्याचे पुनर्मुद्रण होत आहे हे औचित्य साधले आहे असे मला वाटते.

याद्दष्टीने या पुस्तकाचे पुनर्मुद्रण आमची स्नूषा व श्री. बापूसाहेबांची सुकन्या सौ. अपर्णा अनिलप्रभू केळकर हिने केले आहे. या गोष्टीने श्री. बापूसाहेबांना अतीव आनंद व समाधान होणार आहे.


या पुनर्मुद्रण पुस्तकास भगवान श्रीसद्गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज, श्रीसद्गुरु श्रीब्रम्हचैतन्यमहाराज व श्री. बापूसाहेब पटवर्धन यांचे आराध्य दैवत श्रीवेणुगोपाळ यांचा आशिर्वाद लाभावा अशी त्यांचे चरणी प्रार्थना करुन येथे थांबतो.

शुभं भवतु!

आपला,

सांगली,
६।१२।१९९५

राम गोविंद केळकर



श्रीरामचंद्रावजी महाराज



श्रीनिंबरगीकर महाराज



श्रीसाधु महाराज



श्रीमामा महाराज



श्रीतात्यासाहेब महाराज



श्रीदादा महाराज

# अनुक्रमणिका


| अध्याय | विषय | ओव्या | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| १ | श्रीगणेशसरस्वती गुरुपरंपरा- स्तवन | ५७ | १-६ |
| २ | सद्गुरु स्तवन | ५४ | ७-१२ |
| ३ | अवतार वर्णन | ३७ | १३-१६ |
| ४ | विवेक- वैराग्य- वर्णन | ४७ | १७-२१ |
| ५ | शमदमादि साधन- वर्णन | ५४ | २२-२७ |
| ६ | गुर्वानुग्रह- कृपाशीर्वाद वर्णन | ५९ | २८-३४ |
| ७ | साधनमार्ग- वर्णन | ६७ | ३५-४१ |
| ८ | कीर्तन- साधन प्रसंग वर्णन | ७५ | ४२-४९ |
| ९ | गृहस्थाश्रम वर्णन | ५४ | ५०-५५ |
| १० | सिद्धस्थिती वर्णन | ६६ | ५६-६२ |
| ११ | साक्षात्कार स्थिती वर्णन | ५२ | ६३-६८ |
| १२ | स्वानुभव- वर्णन | ५६ | ६९-७४ |
| १३ | फलश्रुती वर्णन | २२ | ७५-७७ |
| | | ७०० | |
| | पद - पदांतरे | | ७८-८३ |

॥ श्रीसद्गुरु रामचंद्रायनमः ॥

# श्री हनुमद्गुरुचरित्रबोध-सार

## प्रथम अध्याय

॥ श्रीगणेशायनमः ॥

ॐ नमोजी श्रीगुरु गणेशा । आधार चक्री स्थित सर्वेशा । जगदाधारा जगदीशा । जगत्पाला विघ्नहरा ॥१॥ आधार चक्रीचा श्रीगणेश । काय वर्णू त्याचे यश । योगी भक्त पावती परम उल्हास । वैभव तेथील देखोनी ॥२॥ पाहू जाता चर्म दृष्टी । न दिसे वैभव व्हाल कष्टी । म्हणोनि उघडा ज्ञान दृष्टी । संत मार्गे चालावे ॥३॥ संत कृपा जाहल्याविण । संत मार्ग अनुसरल्याविण । नव्हे निर्गुणदेवदर्शन । सत्य सत्य त्रिवाचा ॥४॥ भगवद्भक्तांचा व्यवसाय । हरिकीर्तनाचा महोत्सव । भक्तजनांचा समुदाव । टाळ मृदंगयुक्त पै ॥५॥ दशविध वाद्यांचिया ध्वनी । चौघडे वाजती अनुदिनी । हरिनाम नौबदांचा ध्वनी । नाना प्रकारे ॥६॥ तंत वितंत घन सुस्वर । तार मंद्र विगत घोर । डफडी डफगाणी नाग सुस्वर । अपार वाद्ये वाजती ॥७॥ सप्तस्वरयुक्त गायने । राग उपराग तान माने । सावडे भक्त हरिकीर्तने । नाचती प्रेमस्वानंदे ॥८॥

ऐसिया संतांचे संगती असे । जे आधार चौकीशी प्रवेशले । त्यांचे दृष्टीचे पारणे फिटले । ॐकारगणेशादर्शन ।।९।। ऐसा मूळबीज सर्वेश्वर । गणराज विघ्नहर । रूप तयाचे वर्णन करू । जे वेद पुराणी गाइले ।।१०।। पाहो जाता आधारकमळी । तव अति सुरेख मंडपातळी । विराजमान चतुर्दळी । रम्य सिंहासन करोनी ।।११।। कुंकुमापरिस आरक्त । आधार स्थानी विराजत । गजानन सिद्धिबुद्धिसहित । वं शं षं सं सिंहासनी ।।१२।। मस्तकी मुगुट रत्नखचित । भाळी सिंदूर विराजित । शुक्लांबर वेष्टिले विद्युल्लतावत् । आणि चतुर्भुज ।।१३।। करी फरश अंकुश अंबुज । तैसे अभय वरदाचे ओज । पाहा नवल मूर्तिचे चोज । वाटे अद्‌भुत ।।१४।। ऐसिया पाहोनी सुपास । प्रेमे चरणी विराले मानस । मनी धरिली होती जे आस । गुरुचरित्र वर्णावे ।।१५।। परमानंद सहजानंद । वीरानंद योगानंद । चतुर्दळीचा आनंद । आनंदरूपाचा प्रस्ताव ।।१६।। ज्या योगे तो आनंदकंद । जया नाम सच्चिदानंद । तोचि गणेश निजानंद । मम मानसाते आकळी ।।१७।। आकळोनी कृपा केली । ह्मणे ऊठ तुझी चिंता गेली । गुरुचरित्रवर्णन शैली । प्राप्त झाली तुजलागी ।।१८।। ऐसे वदोनिया त्वरित । मस्तकी ठेविला वरद हस्त । गुरुचरित्र पूर्णत्वाप्रत ।

निर्विघ्नपणे जाईल ॥१९॥ ज्याचे चिंतने निर्विघ्न जाहले । म्हणोनी विघ्नहरु नाम पावले । त्याचेनि अभये मानस स्थिरावले । गुरुचरित्र वर्णावया ॥२०॥ ऐसा मंगलमूर्ती मंगलमय । देता झाला वरपसाय । तो लाहोनी स्वानुभवे तन्मय । सरस्वतीवंदना पातलो ॥२१॥ जय जयाजी देवी शारदे । चिच्छक्ति परमानंदे । भक्तजना अभयवरदे । आदि माय तू स्वामिणी ॥२२॥ तू योगी जनांची समाधी । तोडिसी विद्या अविद्या उपाधी । तुझेनि कृपे सत्वशुध्दी । प्राप्त होय साधका ॥२३॥ तू योगी जनांचे ध्यानी । तू साधकांचे चिंतनी । तू सिध्दांचे अंतःकरणी । समाधिरूपे ॥२४॥ तूचि परमार्थाचे मूळ । तूचि सद्विद्या केवळ । तुझे रूप निवांत निर्मळ । निश्चल स्वरूप स्थितियुक्त ॥२५॥ परेपासोनी वैखरी । रूप जियेचे चराचरी । व्यापक सकळांचे अंतरी । शब्दशक्तिरूपिणी ॥२६॥ अद्वय शब्दनामघोष । रूप जियेचे निर्गुण सुवेश । शब्दनिःशब्दाचे सौरस । शब्दमंदिरी ठाकली ॥२७॥ जियेचे मंदिरी प्रवेशता । शब्दासि आली निःशब्दता । अखंडवाचे अखंडिता । स्तवन चालिले निर्धारे ॥२८॥ स्तवनाकार जाहली वृत्ति । अंगी बाणली महंतांची शांति । सदनमहिमा नैराश्य विरक्ती । प्राप्त करवी साधका ॥२९॥ विघ्नहरकृपे

सहा जणा । कामक्रोधादिकांसी जाणा । धका मारोनि सद्गुणसदना । श्रीशारदेच्या
पातलो ।।३०।। जेथील पाहता वैभव । कळाकुसरी नाना लाघव । मनासी
आले मार्दव । शब्दकाठिण्य विराले ।।३१।। तेथील शोभेचा प्रकार । अनुभवे
पाहावा साचार । धरिता संत जनांचा आचार । प्रवेश होतसे त्या ठायी ।।३२।।
सरस्वती अंबा देखिली । लावण्यशोभायमान माउली । जियेचे रूपाची खोली ।
वेदी ऋषिजनी गाइली ।।३३।। वदन चंद्रमा मनोहर । चतुर्भुजा माय अतिसुंदर ।
साळंकृत नेसली चिदंबर । कंचुकी तेजोमय ।।३४।। मस्तकी रत्नपुष्पांची जाळी ।
रत्नमणी अळंकार निजांगमेळी । वीणा जपमाळा दशनादे शोभे करतळी ।
आरोहण करी निजहंसी ।।३५।। ऐसी आद्यंत ब्रह्मतनया । जे का जगदादि
मूळमाया तुर्या । ते साष्टांगे वंदोनि स्तविली मिया । निजात्मभावे ।।३६।।
तू सतरावी जीवनकळा । मोक्षश्री महामंगळा । ऐसे स्तवोनि चरण-कमळा ।
वरि मस्तक ठेविले ।।३७।। आनंदमय जाहली वृत्ति । काही आठवेना चित्ती ।
मनीचा हेतू मना अंती । विराला माय-दर्शने ।।३८।। पूर्णानंदी पूर्ण-रूप ।
होवोनि ठाकले तद्रूप । गुरु-चरित्र-वर्णनाचा हुरूप । मनीचे मनी
राहिला ।।३९।। तव माय उठवी धरोनि कर । मस्तकी ठेविला अभय कर ।

अंकी बैसवोनि कृपामृतें मधुर । वाक्य कानीं सांगत ।।४०।। प्रेमें वोरसे सोहं माया । ह्मणे बा रे बालराया । मद्दर्शनासी आलासी जया कार्या । ते निःसंदेह पूर्ण झाले ।।४१।। मी दिधलासे कृपावरद वर । आता वर्णन करी गुरुचरित्र गंभीर । ज्याचियें श्रवणें चराचर । पावन होतील तात्काळ ।।४२।। ऐसा वर देवोनि जाण । पुन्हा धरिले मातेचे चरण । मायें एक आश्वासन । पाहिजे असे बालका ।।४३।। जे जे वेळी मनी भाव । तंव दर्शनाचा करीन आठव । ते ते वेळी प्रगटोनी माय । गुरुचरित्र चालवी ।।४४।। तरीच मी गुरुचरित्र । वर्णन करण्यास धजेन साचार । ज्याचा न कळे अंत पार । ते मज बालका केवि कळे ।।४५।। ऐसे जाणोनि अंतर । माय काय बोले उत्तर । मी अखंड निरंतर । राहीन तुझिये जिव्हाग्री ।।४६।। ऐसे अभय देवोनि मज कृपावलोकनें । बहु कुरवाळिले कराने । ह्मणे माझे बालक तू तान्हे । काही चिंता करू नको ।।४७।। ऐसा श्रीगणेश-सरस्वती-वर मिळता जाण । दास झाला सुख-संपन्न । सद्गुरु-चरणापासी जाण । चरित्र-वर्णना पातलो ।।४८।। ॐ कार-युक्त गुरु-परंपरेसी । अखंड धरुनी निजध्यासी । वंदीतसे अहर्निशी । निजात्मभावें ।।४९।। आद्य सद्गुरु रेवणसिद्ध । बिंदु

स्वरूप जे शंभु प्रसिध्द । जया नमिता आत्मबोध । उदया आला ।।५०।। मरूळप्रभू श्रीकाडसिध्द । अर्धमातृकास्वरूप अगाध । जे का अनादि प्रसिध्द सिध्द । आत्मस्वरूप ।।५१।। अकार गुरुलिंग-जंगम । सद्गुरु नारायण परम । जे का स्वयेंचि जाहले ब्रह्म । श्री काडसिध्दगुरुकृपें ।।५२।। उकार मोक्ष-लक्ष्मी जाण । लक्ष्मीआक्का भाग्यवान । रघुनाथ-प्रिय-बंधु प्रमाण । जया असे ।।५३।। मकार रघुनाथप्रिय गुरुवर स्वामी । ब्रह्मचारी रतले नामी । जे का स्वस्वरूप-धामी । लीन जाहले ।।५४।। ईकार साधु रामराज । साधुराय ज्या सद्गुरुराज । ज्यांनी साधिले निजकाज । निज देही ।।५५।। एंकार संतराज हनुमंत । धन्य धन्य रामभक्त । प्रपंचात परमार्थ । साधिला ज्यांनी ।।५६।। ॐ कार-युक्त-गुरु-परंपरा-स्तवन । करिता जाहले समाधान । संतांचे आशीर्वादे करून । गुरुचरित्र वर्णितसे ।।५७।।

स्वस्तिश्री हनुमद्-गुरुचरित्र-बोध-सार । श्रीगणेशासरस्वतीगुरुपरंपरा-स्तवन- सुमन सुंदर । अर्पोनिया श्रीगणेशासरस्वतीगुरु चरणावर । प्रथमाध्याय संपविला ।।

इतिश्री हनुमद्गुरुचरित्र-बोधसारे प्रथमोध्यायः

# द्वितीय अध्याय

।। श्रीगणेशायनमः ।।

आता नमू सद्गुरुवर्या । अज्ञान-तिमिर-तमहरण सूर्या । निशिदिनी लागतसे पाया । कृपा करावी मजवरी ।।१।। आपुले स्वरूप निर्मळ । ब्रह्म ऐसे निश्चळ । मनी आठविता तळमळ । उरेल कैंची ।।२।। आपुले स्वरूप पाहाता । नाठवे देहभाव चित्ता । म्हणोनी स्वामी माझिया हिता । अवर्णनीया वर्णन करीतसे ।।३।। आपुले स्वरूप- गुणगान । करिता मन होये उन्मन । म्हणोनी स्वामी महिमान । आपुले वर्णिनि म्हणीतसे ।।४।। आपुले स्पर्शिता चरण । चित्त चैतन्यी होय लीन । म्हणवुनि करीतसे नमन । आपुलिये चरणावरी ।।५।। आपुले स्वरूपाची परी । वर्णिना वेदा चतुरी । नेति नेति ह्मणोनि अंतरी । मौन धरुनि राहिले ।।६।। मौन धरिता अंतरी । प्रगट बाह्य अभ्यंतरी । अनुभवासी आले निर्धारी । आपुले ब्रह्मरूप गुरुवर्या ।।७।। शेषादिक ब्रह्मादिक देव । जाणो न शकती आपुली माव । गुरुस्वरूपाचा ठाव । शोधिता निश्चळ राहिले ।।८।। निश्चळ राहता अंतरी । मीपण गेले निघोनि दुरी । चित्त चाकाटले परी । स्वरूप महिमा कळेना ।।९।। शेवटी विरालेसे मन । तेव्हा मनासी आले कळोन । अतर्क्यातर्क्य गुरुचरण । स्वरूप गहन गहनासी ।।१०।।

नवल आकाशाची परी । आकाशा न कळे स्वरूपथोरी । आकाशपण सांडोनी अंतरी । स्वरूपी लीन जाहले ।।११।। आकाशाचा शब्दगुण । तो शब्द जाहला निःशब्द जाण । ज्या शब्दे वेद महिमान । वर्णोनी वेदत्व पावले ।।१२।। गुरुरूप ब्रह्मरूप । शब्द दोन अर्थ एक । एका पासोनी अनेक । परी एकत्वरूप कळेना ।।१३।। कळेना म्हणोनी शोधिता । शोध शोधुनी पाहाता । पंडिताची पंडितता । सर्वोनी मूढ जाहले ।।१४।।पांडित्ये न कळे हा प्रांत । गुरुस्वरूप ते अनंत । गुरुकृपेविण गुरुस्वरूपाची मात । न कळे जाण कोणासी ।।१५।। वेदा सारिखे भागले । तेथे इतरांचे काय चाले । बोलता बोलणे थकले । बोल बोलता ते अबोल ।।१६।। आपुले स्वरूप अकळ । परी आपण देही दाविता कळ । तरीच प्राणिमात्र सकळ । जाणती आपुले स्वरूपा ।।१७।। सद्गुरुस्वरूप पाहाता । मुक्तीसी मुक्तपण ये हाता । ह्मणोनिया निवांतता । चरणी शरण रिघालो ।।१८।। आपुले स्वरूप वर्णवेना । तेथे अज्ञान स्पर्शों शकेना । ज्ञाना नुरे ज्ञानपणा । अनिर्वाच्य स्वरूप ते ।।१९।। आपुले चरण कळोनि येता । मग कायसी जीवासी चिंता । चिंतेची निवारोनी चिंता । चरणी स्थिर होतसे ।।२०।। चित्त जडोनी राहे पायी । निघो जाता निघता

न येई । ते पाय तुझे गुरुमाई । पाहाता पाहणे धन्य जाहले ।।२१।। नवल चरणाचे महिमान । पाहू जाता कळेल खूण । जेणे योगे ब्रह्म सनातन । ते हे चरण श्रीगुरुचे ।।२२।। त्रिकूट शिखरावरती स्वामी । आपण राहता नित्यनेमी । ते पाहिले अंतर्यामी । आपुले कृपे करोनि ।।२३।। त्रिकूट स्थान निर्मळ जाण । थोर तेथील महिमान । तीन गुण आपुले गुण । सोडोनी निर्गुण होताती ।।२४।। तीन गुणांचे बंधन । जीव मात्रा लागी जाण । तोडिता तुटेना गहन । ते या ठाया नुरतसे ।।२५।। त्रिकूट शिखर अति सुंदर । अति रम्य मनोहर । मनोवृत्तीचा पार । सरोनि स्थिर होतसे ।।२६।। मन पांगुळोनि जाता । मनासी कळे तेथील रम्यता । मनोभ्रमणे जन्म- मरण- चिंता । तये ठायी नुरतसे ।।२७।। सद्भाव वृक्ष गगनचुंबित । भक्ति-लतेने वेष्टित । विराग विवेक फुले- फळे सहित । असती नित्य प्रफुल्लित ।।२८।। सद्वासना दूर्वांकर । व्यापोनी राहती सर्व शिखर । जेथे वस्ती निरंतर । हरिहरादि कक इच्छिती ।।२९।। ऐसे स्थान अवर्णनीय । त्रिवेणीचे वाहे तोय । स्नाने पाने जिवाचे भवभय । हरोनि निर्भय होतसे ।।३०।। इडा पिंगला सुषुम्ना । गंगा सरस्वती यमुना । यांची ओळखावी खुणा । गुरुकृपे

करोनि ।।३१।। ऐसी गंगा जये स्थानी । झुळ झुळ वाहे निशिदिनी ।
त्रिकूटस्थानाची धरणी । अति पवित्र सर्वस्वे ।।३२।। ओघ वाहे सनातन ।
गुरुकृपे यात करिता मज्जन । दुर्जन होतील सज्जन । ऐसे महिमान जळाचे ।।३३।।
संगमस्थान मनोहर । तेथे वास करिती गुरुवर । जया स्वरुपाचा पार ।
ब्रह्मादि देव नेणती ।।३४।। अरुपाचे रुप पाहि । गुरुकृपे कळो येई । इतरासी
न कळे सोयी । या रुपाची सहसाही ।।३५।। साकारात निराकारी । ते रुप
जाणावे चतुरी । जे का असे अभ्यंतरी । चराचर प्राणीमात्रांचे ।।३६।। तरीच
प्राणी होईल मुक्त । ऐसी गुरुकृपेची युक्त । जेणे प्राणी होती शक्त । भव-
बंधन तोडावया ।।३७।। तेचि सगुण साकार । भावे कळोनि घ्यावा प्रकार ।
न राहे अंतरी विकल्प- विचार । तरीच हे कळो येईल।।३८।। गुप्तस्थान
पाहाता पाही । चित्त चाकाटोनी जाई । मौक्तिके मढविले कायी । ऐसे स्थान
मनोहर ।।३९।। नक्षत्रांचा सडा होई । ऐसा प्रकार दिसो येई । नवल गुरुधामाची
नवलाई । वर्णन कायी करावे ।।४०।। ये ठायी गुरुचरणासी । पातलो अति
उल्हासेसी । गुरुंनी आणिले आपणासी । आपुले ठाया म्हणवुनी ।।४१।।
पाहिले गुरुरुप सुंदर । घातला दुरुन नमस्कार । मनात आहे श्रीहनुमद्-

गुरुचरित्र बोधसार । वर्णन करवाचे या भावे ॥४२॥ काय आहे मी अधिकारी । ह्मणोनि धरावे ऐसे अंतरी । परी जाणोनि गुरुचरणाची थोरी । मनी धरोनिया आलो ॥४३॥ ऐसे मनी धरोनी वारंवार । चरणी करिता नमस्कार । पुन:पुन्हा अतिसादर । प्रेमभावे करोनिया ॥४४॥ द्रवले सद्गुरुंचे अंतर । ठेविला मस्तकी अभयकर । ह्मणती गुरुचरित्र-बोधसार । तुझे अंतरी प्रगटले ॥४५॥ आता कायसा विचार । तव मुखे बोलेन मी साचार । जे मनी घेता चराचर । प्राणिमात्र मुक्त होती ॥४६॥ ऐसा वर होता जाण । मनासी झाले समाधान । विरोनि गेलेसे मीपण । चरित्र वर्णन करीन हा ॥४७॥ आता सहजे बोलवितील गुरुवर । तेचि बोलेन साचार । एकचित्ते मनी घेता विचार । साक्षात्कार साधका ॥४८॥ साधक सिद्ध होय कैसा । गुरु- बोधीचा विषय ऐसा । करोनि दावितील सुगमसा । श्रीगुरु आपल्या सामर्थ्ये ॥४९॥ ती कृपावचने अति सुंदर । सुमने सुवासिक मनोहर । हुंगोनि आमोद परिकर । सेविता सिद्धपदी जाईल ॥५०॥ कृपावचन- महिमा सांगता । श्रीज्ञानेश्वर स्मरण झाले चित्ता । ज्यांचे कृपा योगे चरित्र कथा । वदणे घडोनिया आले ॥५१॥ ज्यांनी ठेवोनि मस्तकी कर । गुरुस्थान दाविले सुंदर । ह्मणोनि असता

प्रपंच विस्तार। परमार्थमार्ग आकळविला ।।५२।। प्रपंची परमार्थ साधशील। ऐसे कृपावचन ज्यांचे सखोल। तेचि मनी धरोनिया ओल। चरणी अखंड राहिलो ।।५३।। अखंड ठेविती चरणी। नमस्कार करितो निशिदिनी। ज्यांचे कृपेची करणी। अकळ परी मनासी कळली ।।५४।।

स्वस्तिश्री हनुमद्-गुरुचरित्र-बोधसार। सद्गुरु-स्तवन सुमन सुंदर। अर्पोनिया श्रीगुरुचरणावर। व्दितीयाध्याय संपविला ।।

**इतिश्री हनुमद्गुरुचरित्रबोधसारे व्दितीयोध्यायः**

# तृतीय अध्याय

।। श्रीगणेशायनमः ।।

जय जयाजी सद्गुरुवरा । नमन तुज विघ्नहरा । प्रगटोनिया मम अंतरा । वदवी चरित्र आपुले ।।१।। तूचि कर्ता तूचि धर्ता । तूचि हृदयी वास करिता । तूचि सकळा मार्ग- दाता । चिन्मय- स्वरूपा वेद वंद्या ।।२।। ऐसे प्रार्थिता सत्वर । काय बोलिती सद्गुरुवर । हृदयी प्रगटोनी साचार । आशीर्वचन बोलिले ।।३।। तुझा भाव असे थोर । मम चरित्र वर्णावे बोधसार । जे सद्भावे वाचिता नारीनर । मुक्त होतील तात्काळ ।।४।। परी वर्णावे थोडक्यात । ओव्या करूनी सात शत । साधनमार्ग कळोनि येईल ज्यात । जेणे बद्ध सिद्धस्थिती पावेल ।।५।। बद्धापासूनि सिद्धवरी । गुरुकृपे कैसे साधन साधावे चतुरी । ते मी आचरोनी दाविले कुसरी । त्याचे वर्णन करावे ।।६।। ते मम चरित्रसार समग्र । तुझे हृदयी प्रगटले पवित्र । जे सद्भावे पढता प्राणिमात्र । जड मूढ तरतील ।।७।। ऐसे देउनी आशीर्वचन । प्रगटरूपे पुढे ठाकलेसे जाण । मस्तकी वरद हस्त ठेवोन । वर्णन करी ऐसे बोलिले ।।८।। सद्गुरुंचे कृपावचन । ऐकोनि थोर आनंदले मन । ऐका श्रोते संत सज्जन । चरित्र संक्षेपे सांगेन ।।९।। सद्गुरुचरित्र आहे थोर । त्याचा अंत नाही लागणार । ह्मणोनि त्यांचे आज्ञेप्रमाणे

साचार । थोडक्यात वर्णिन ॥१०॥ जे कोटणीस कुळी पूर्वापार । रामभक्ति चालली थोर । वंशपरंपरागत साचार । जैसी संतजनी वर्णिली ॥११॥ जैसे बीज तैसे फळ । हा शास्त्राचा न्याय कराया सबळ । ह्मणोनि शोधिले हे कुळ । अवतार घ्याया कारणे ॥१२॥ परंपरा चालणे कठिण । परि सत्कुळामध्येचि आढळते जाण । ती परंपरा टिकवून । थोर दाविली या कुळी ॥१३॥ पांडुरंगराव कोटणीस धन्य । मुधोळ ग्रामी नामपरायण । जेणे तुष्ट होय भगवान । ऐसी अनन्यभक्ती करोनि असती ॥१४॥ काढोनि संसारातील मन । भगवत्पदी करिती लीन । सर्वही आचार देवा कारण । येणे रिती वर्तती ॥१५॥ त्यांची भार्या रुक्मिणी सती । त्यांना अनुकूल वर्तोनि रिती । पतिसमागमे भगवद्भक्ती । अनन्य भावे करोनि ॥१६॥ असावे पतिसेवेसी रत । चालवावे कुळाचार व्रत । जेणे कुळपरंपरागत । वैभव जगती वाढेल ॥१७॥ त्यांचे पोटी सद्गुरुवर । अवतरले करावया जगदुद्धार । कार्तिक शुद्ध अष्टमी शके सतराशे शहात्तर साचार । तेरदळग्रामा माझारी ॥१८॥ ते हनुमंताचा अवतार । हनुमंत पांडुरंग कोटणीस साचार । ज्यांचेनि कोटणीस कुळ थोर । जगामाजी जाहले ॥१९॥ त्रेतायुगी हनुमंत । ब्रह्मचारी सेवाव्रत । सीताराम कुळदैवत । उपासोनी

राहिले ।।२०।। चिरंजीव भगवद्भक्त । ज्यांची करणी अनंत । रावणकुंभकर्णा
यमप्रांत । ज्यांनी प्रतापे दाविला ।।२१।। व्दापारी कृष्णभेटीसी आले । बळरामनाम
आयकिले । बळराम गर्वे ज्यासी ताडण्या चालिले । परी बळ काही चालेना ।।२२।।
मग जाहले शरणागत । बळराम आणि गरूड सत्य । गरूडासी बळ गर्व
नित्य । तो श्रीमारूतिरायें हरविला ।।२३।। जया साठी कृष्ण रूक्मिणी ।
झाले रामसीता जाणी । ज्यांची भक्ति वर्णिता वाणी । मूक झाली वदवेना ।।२४।।
तया श्रीमारूतिचरणावर । वारंवार नमस्कार । जे कलियुगी प्रथम रामदास
साचार । होवोनिया अवतरले ।।२५।। तेथेही ब्रह्मचारी व्रत । श्री सीतारामसेवा
नित्य । रामनामी सदा रत । जगदुद्धार केला असे ।।२६।। रामदास अवतारी
मातृआज्ञा । लग्न करी रे सर्वज्ञा । तेथे युक्ती लढविली ऐसी प्रज्ञा । सावधान
ह्मणता सावध जाहले ।।२७।। मातेसीं दुःख जाहले । हे शल्य अंतरी राहिले ।
ते निवारावया भले । हनुमंतरूपे अवतरले ।।२८।। येथे केला संसार । गृहस्थाश्रम
एकनाथा ऐसा थोर । ऐसे मातेचे अंतर । तृप्त केले जयांनी ।।२९।। धन्य
तयांची जननी । जे पूर्वीची अंजनी । नमन माझे त्यांचे चरणी । प्रेमभावे
सर्वदा ।।३०।। जिचे उदरी अवतार । हनुमंत झाले जगी थोर । त्यांचे चरणी

वारंवार। नमन करी साष्टांगे ।।३१।। हनुमंत अवतार म्हणितले। म्हणाल अनुमाने सांगितले। तरी त्यांनी आपुले पदी असे लिहिले।·स्वये अंजनीसुत ऐसे ।।३२।। सद्गुरू- करणी अगाध। बद्ध तोचि होईल सिद्ध। परि पाहिजे भाव शुद्ध। बद्धांतरी प्रगटला ।।३३।। मी आहे मायेने बांधला। हे कळोन येईल ज्याला। तो बद्ध आपणाला। सोडवू शकेल गुरूकृपे ।।३४।। नवल सद्गुरूंची करणी। मार्ग दाविती अंत:करणी। जेणे बद्ध प्राणी आत्मभुवनी। आत्मसुखे सुखावती ।।३५।। ऐसी करणी करविती। जेणे स्वरूप- प्रचीती। येवोनि चित चैतन्याचे प्रांती। चैतन्य स्वरूप होईल ।।३६।। ते नित्यानित्यादि-साधन- सिद्धता।·कैसी येईल बद्ध जीवाचे हाता। ते सद्गुरूनाथांचे कृपे सर्वथा। पुढील अध्यायी वर्णिन ।।३७।।

स्वस्तिश्री हनुमद्गुरूचरित्रबोध- सार। अवतारवर्णन सुमन सुंदर। अर्पोनिया श्रीगुरूचरणावर। तृतीयाध्याय संपविला ।।

**इतिश्री हनुमद्गुरुचरित्र- बोधसारे तृतीयोध्याय:**

# चतुर्थ अध्याय

।। श्रीगणेशायनमः ।।

जय जयाजी सद्गुरुराया । विनवीतसे तव पाया । आता कृपा करोनी सदया । वदवी चरित्र आपुले ।।१।। मी तव चरणीचा दास । हे मनी धरलीसे आस । ते पूर्ण करी गा मानस । जेणे समाधान अंतरी ।।२।। ऐसा धरोनि राहिलो हेत । तंव सद्गुरुराज काय बोलत । पुढील वर्णन नित्यानित्य । विरागादि बोलिजे ।।३।। बोल ह्मणता वाचेसी आले । तेचि आयकावे भले । जे अंत:करणी घेता वहिले । कल्याण होईल जीवाचे ।।४।। करोनी नित्यानित्याची छाननी । नित्यामाजी असावे निशिदिनी । नित्य काय ते उमगोनी । घ्यावे विचारावे अंतरी ।।५।। नित्य अनित्य मिसळले । ते पाहिजे वेगळे केले । तरीच कळो येईल वहिले । नित्य काय ते आपणा ।।६।। एकाग्र करोनी अंत:करण । आत स्थिर करावे मन । स्थिर मने पाहता जाण । कळो येईल अंतरी ।।७।। अंतरी पाहता पाहता जाण । कळोनि येईल आपुले आपण । जे साधिलिया अनुसंधान । अनित्य मनास स्पर्शेना ।।८।। नित्य वस्तू असे सतत । जैसी तैसी नवी नित्य । अनित्य देहादि- विकारयुक्त । क्षणोक्षणी पालटे ।।९।। पालटे परि न कळे जीवा । हाचि अनित्याचा गोवा । पाहावे धरोनि सद्भावा ।

तरिच नित्य कळो येईल ।।१०।। ऐसी नित्यानित्याची छाननी । सद्गुरुराज करिती बाळपणी । परि तयांची करणी । कोणास कळो येईना ।।११।। खेळामाजि खेळता जाण । देव करावा निर्माण । आपण त्याचे पुढे बैसोन । ध्यान धरावे अंतरी ।।१२।। त्याचेच बोलणे बोलावे । त्याचेच चालणे चालावे । त्याचेच सांगणे सांगावे । ऐसे नित्य वर्तती ।।१३।। हिंडता फिरता बोलता चालता । नाना व्यवसायी चित्त असता । टाकोनी अनित्याची वार्ता । नित्यामाजी असावे ।।१४।। ऐसे चाले सतत । परि कोणास न कळेचि ही मात । की या बालकाचे चित्त । नित्यामाजी वर्ततसे ।।१५।। बाह्य दृष्टीने पाहाता । काय कळो येईल चित्ता । जे का अंतरीची वार्ता । ते अंतरज्ञान्यासी कळेल ।।१६।। ऐसे बहुत प्रकारी वर्तती । परि कोणा न कळे त्यांची स्थिती । जे का अंतरीची आर्ती । ते अंतरी धरोनि असावे ।।१७।। रात्री एकांती उठावे । एकांतामाजी बसावे । परि तयांचा एकांत स्वभावे । कोणास कळो येईना ।।१८।। एक देवाचे ध्यान धरोनि चित्ती । सप्रेम भावे अति प्रीती । लावोनि कर्पूर-दीप- ज्योति । कोणा नकळत बैसावे ।।१९।। ज्या एकातोनी निघे सर्व । ज्या एकात मावळे सर्व । त्या स्थानाचा शोधोनि ठाव । त्या एकांती राहती ।।२०।।

ऐसा ज्यांचा चाले क्रम । परि कोणास कळेना दुर्गम । न कळो द्यावे ऐसे वर्म । अंतरी धरोनि वर्तावे ।।२१।। बाळपणी त्यांची करणी । बाल म्हणोनि पाहती नयनी । कवतुक करिती निशिदिनी । परि अंतर कोणा कळेना ।।२२।। अंतरीचे अंतरी राखिले । ऐसे बालपण गेले । पुढे विद्याभ्यासादि करिता चांगले । त्या माजीही ऐसे वर्तावे ।।२३।। व्यवहार चालवावा उत्तम । नित्यकर्म नेमानेम । परि अंतरीचे वर्म । न सोडावे सहसाही ।।२४।। मारुतीचा अवतार परम । बुद्धी असे उत्तमोत्तम । हे कळोन येतसे सुगम । सर्व जणांसी सर्वदा ।।२५।। शाळेत गुरुंनी वर्णावे । बुद्धिमान ऐसे म्हणावे । परि त्यांचे बुद्धीसी नेणवे । जे का बुद्धी अलौकिक ।।२६।। त्यांची बुद्धि कोणास कळली । कळता मिळेल साउली । जी संतजनी साधिली । गुरुकृपे करोनिया ।।२७।। ऐसा चाले वर्तन- क्रम । चित्त पावले ज्यांचे उपरम । तो विरागी बोलिजे परम । ज्यांचे ठायी दिसतसे ।।२८।। बाह्य दाखवावा लौकिक । परि अंतरी धरावे अलौकिक । ऐसा संत जनांचा दंडक । ज्यांचे ठायी सदा असे ।।२९।। अलौकिक देही असे । तेचि अंतरी धरावे कैसे । त्यांची करणी कैसी असे । तैसीच धरिती अंतरी ।।३०।। ज्यासी कळली नित्याची कथा । तोचि जाणेल

वैराग्य- वार्ता । ते वैराग्य आयकावे आता । जे सद्गुरुराज बोलविती ।।३१।। इहामुत्रार्थ फलभोग । हे तो लौकिकाचे भाग्य । परी मेळविता वैराग्य- भाग्य । हे भाग्य तुच्छ त्या पुढे ।।३२।। जरी जाहला भाग्यवंत । तरी भेटेना भगवंत । परि वैराग्य- भाग्ये भाग्यवंत । तया भगवंत भेटतसे ।।३३।। स्वर्ग- सुखाचे बोलणे पाही । त्यांच्या गांवीही येत नाही । तेथे इतर सुखांचे महत्व पाही । काय असेल तयासी ।।३४।। ऐसे मन सर्वातोनि निघाले । स्वरूपी स्वरूपाकार झाले । तेचि वैराग्यवंत भले । ऐसे वैराग्य धरावे ।।३५।। सर्वातोनि निघाले प्रेम । आता स्वरूपी जडोनी गेले परम । अमृत सेविणार उत्तम । अन्य पदार्थ दृष्टी न पाहे ।।३६।। ऐसे सद्गुरुंचे मन । निघाले असे सर्वातून । परि बाह्य आचरण । लौकिकाचारे दाविती ।।३७।। आत्मस्वरूप अंतरात । तेथे ठेवोनी राहती चित्त । बाह्य भोगी न राहावे रत । हे जयांनी साधिले ।।३८।। स्वरूप कैसे अंतरात । ऐसे जे आणिती मनात । तरी तयांनी आपुले चित्त । नाही अंतरी आणिले ।।३९।। चित्त नाही अंतरी आले । तरी अंतरीचे रूप कळेना भले । म्हणोनी आधी पाहिजे आणिले । चित्त अंतरी देहांत ।।४०।। नित्यामाजी चित्त येता । कळो येईल स्वरूप- वार्ता । तये

स्वरूपी चित्त जडता । वैराग्य तयासी बोलिजे ।।४१।। चित्तें पाहता प्रेम जडले । चैतन्य स्वरूपी विरोनी गेले । विश्व मावळोनी गेले । एकचि उरले अंतरी ।।४२।। तेचि भाग्य तोचि भोग । सरले बाह्य उपभोग । बाह्य होता जो अनुराग । तो अंतरी मिळाला ।।४३।। ऐसे अंतर अंतरी मिळाले । खरे भाग्यवंत झाले । लौकिक भाग्य नाही उरले । म्हणोनी चिंता वाटेना ।।४४।। साधिता साधन- संपत्ती । येर भाग्याची कायसी महती । बाह्य भाग्याची कल्पनाही चित्ती । ज्यांचे अंतरी असेना ।।४५।। ते शमदमादि साधन । लौकिकचार सांडून । कैसे सद्गुरुंनी साधिले पूर्ण । ते पुढील अध्यायी वर्णिन ।।४६।। जे आयकिता कथन । समाधानाचेही समाधान । ऐसे समाधान पावेल मन । ते अंतरी धरावे ।।४७।।

स्वस्तिश्री हनुमद्- गुरुचरित्र- बोधसार । विवेक वैराग्य वर्णन सुमन सुंदर । अर्पोनिया श्रीगुरुचरणावर । चतुर्थाध्याय संपविला ।।

इतिश्री हनुमद्- गुरुचरित्र- बोधसारे चतुर्थोध्यायः ।।

# पंचम अध्याय

॥ श्रीगणेशायनमः ॥

जय जयाजी सद्गुरुवर । नमन तुझिये चरणीं सादर । आता कृपा करोनि मजवर । पुढील चरित्र बोलवी ॥१॥ तव महिमा नकळे कोणासि । शेषादिक ब्रह्मादिकासी । परी कृपा करोनि मजसी । आज्ञा द्यावी वर्णाया ॥२॥ तव सद्गुरु म्हणती तुज । आधीच सांगितले असे गुज । तव मुखें बोलवीन सहज । आता शमदमादि साधन बोलिजे ॥३॥ शम म्हणजे मनासी जिंकावे । दम म्हणजे इंद्रिया जिणावे । हे सद्गुरु साधिती स्वभावे । गृहस्थितीत वर्तता ॥४॥ स्थिती सद्गुरुंचे घरची । असे जाण गरीबीची । परि तयांचे मनाची । अढळ स्थिती सदा असे ॥५॥ मन हिंडे दाही दिशा । हा तो मनाचा स्वभाव सहसा । परि तयासी देवोनी वळसा । अंतरामाजी आणावे ॥६॥ अंतरी आणोनी स्थिर करावे । तयासी आपण उपदेशावे । की अंतरप्रदेशी फिरोनि पाहावे । अंतरी राहावे म्हणोनिया ॥७॥ तव मने रिघो पाहावे बाहेर । तयासी आंत आणावे वारंवार । अंतरी आणोनी सत्वर । फिरवावे अंतर प्रदेशी ॥८॥ ऐसे मनास नाना युक्ती । दाखवावी परमेश्वराची शक्ति । जेणे योगे उपजेल भक्ती । मनात परमेश्वराची ॥९॥ फिरता फिरता अंतरी । प्रवेशावे

देवप्रदेशाभीतरी । ऐसे करिता वारंवारी । मन समाधानासी पातले ॥१०॥ मनासी होता समाधान । झाले सद्गुरूंचे अधीन । ऐसे रीति शम साधन । सद्गुरूंनी साधिले ॥११॥ घरांतील सर्व उपचार । साधेच परी मानावे थोर । प्रेम करावे सर्वांवर । त्यांचा थोरपणा वर्णावा ॥१२॥ साधे भोजन साधे वसन । परी मनात अत्यंत समाधान । ऐसे मनाचे श्रीमंतपण । अंतरी धरोनी राहिले ॥१३॥ नाही कधी हट्ट केला । अमुका पदार्थ द्यावा मला । जो जो ज्या वेळेसी मिळाला । तो तो मानिला थोरची ॥१४॥ विद्या संपादण्या बरवी । कष्ट केले बहुत जीवी । येणे रीति वर्तोनि पदवी । मिळविली जे इतरा न साधिजे ॥१५॥ ऐसे एक ना दोन प्रकार । किती वर्णावे साचार । शम- साधनी धुरंधर । सर्व कार्य साधण्या जाहले ॥१६॥ इंद्रियांसी दमवावे ऐसे । मनी आणिता साधन कैसे । परि जयांचे चित्ती अनारिसे । विचार न सुचती ॥१७॥ इंद्रिये करोनि अंतर्मुख । भोगावे अंतरीचे सुख । परी कोणा न कळेचि देख । काय साधन साधिती ते ॥१८॥ नवल इंद्रियांची करणी । जनासि नेती अधःपतनी । तयासि सहज साधनी । आपुली करोनी ठेविली ॥१९॥ इंद्रिये आपुली करोनी । आपण झाले त्यांचे धनी । नेकनी

परमेशाचे चरणी। स्थिर करिती सर्वदा ।।२०।। इंद्रियांचे पुरवावे कोड। हे तो जनांसी वाटे गोड। परी जया अंतरी ईश्वराची चाड। तयासी हे रुचेना ।।२१।। नेत्रास दाखविती देवाचे रूप। की जे रूपाचे अरूप। जे येता जाताचि नेत्रा सन्मुख। आन पाहणे रुचेना ।।२२।। कानी आयकावे गुणानुवाद। देवाचे करोनी विशद। जे गाती शुकादि नारद। अति प्रेमे करोनिया ।।२३।। रूपाची धारणा धरावी। दृष्टी- माजी साठवावी। ऐशा रीति नेत्रासी बरवी। गोडी लावावी स्वरूपाची ।।२४।। जे गुणानुवाद निरंतरी। सदा उमटती हृदयांतरी। तया ठाया नेवोनी सत्वरी। श्रवणासी गोडी लाविती ।।२५।। अहो भगवंताचे गुण। काय करावे त्यांचे वर्णन। ते ये ठायी जाण श्रवण। श्रवणाकार करावे ।।२६।। दशविध नादांचा प्रांत। ते ठायी श्रवणासी करावे निवांत। येणेचि परि सर्वेंद्रियांवरि मात। करोनी स्वाधीन ठेविली ।।२७।। थोडी विद्या झालिया पूर्ण। करावया नये संपूर्ण। कारण घरचे गरीबपण। ह्मणोनी नोकरी धरियेली ।।२८।। पूर्वापार वंशांतरी। नोकरी चालली असे बरी। ते ठायी रुजू होवोनी सत्वरी। मदत करिती कुटुंबासी ।।२९।। कुटुंबात मंडळी फार। नोकरीचे द्रव्य थोडे पडणार। परी

चित्तासी न पडे मोह साचार । की अन्य रीति द्रव्य मिळवावे ।।३०।। नोकरी इमाने करोनी । संतोषविती आपुला धनी । घरी कुटुंबाची ओढाताणी । परी समाधान अंतरी ।।३१।। चित्तासी दावावे रूप परम । ह्मणोनी साधिला उपरम । येणे रीति साधिती नियम । चित्त स्थिर करावे ।।३२।। चित्त स्थिर करोनी अंतरी । न्यावे देवाचे शेजारी । वारंवार निरंतरी । तये ठायी स्थिर करावे ।।३३।। ऐसा उपरम साधिता । चित्तासी यावी अनन्यता । परी बाह्य वर्तणे वर्तता । अंतर पडो न द्यावे ।।३४।। वय लहान असोन । राखोनी राहावे वामनरावजी चुलत्यांचे मन । वडिलांचे सान्निध्य जाण । फार काळ नाही लाधिले ।।३५।। पगार आलिया जाण । करावा चुलत्यांचे स्वाधीन । येणे रीति अनन्यपण । गृहामाजी वर्तती ।।३६।। त्या काळासी अनुसरोनी । लग्न जाहले लहानपणी । पत्नीचे नाव लक्ष्मीबाई । पतीस अनुरूप मिळाली ।।३७।। वय लहान परी बुद्धी थोर । कामकाजी वर्तती खबरदार । की सर्वांनी ह्मणावे वारंवार । धन्य धन्य ह्मणवोनि ।।३८।। सर्व गोष्टीत समाधान । चांगला वाईट प्रसंग जाण । या सर्वांत चांगले वागोनि समाधान । हनुमंतराय साधिती ।।३९।। सुखदुःखाचे द्वंद्व देखा । परी त्यासी मेळवावे आत्मसुखा । येणे परि वर्तन देखा ।

असे साचार जयांचे ।।४०।। सर्व साहोनी राहिले । म्हणोनि पुढे धन्य झाले । येणे रीति साधन साधिले । न कळत कोणासी ।।४१।। धरिती श्रद्धा नित्य अंतरी । की देव आपुला साहाकारी । त्याची भक्ती वारंवारी । मनोमानसी करावी ।।४२।। श्रद्धा राखणे अढळ । हे काम कठिण केवळ । परि मन जयांचे निर्मळ । म्हणोनि श्रद्धा साधिली ।।४३।। दृढश्रद्धायुक्त अंतर । म्हणोनि जोडिला ईश्वर । अश्रध्देने केले जे साचार । ते मिथ्या ऐसे देव बोले ।।४४।। ऐसे हे श्रद्धेचे बीज । अंतरी रुजविले वागोनि सहज । सहज म्हणजे काय याचा उमज । अनुभवाविण कळेना ।।४५।। श्रद्धा असेल तरिच ज्ञान । खरे कळो येईल जाण । की देवा वाचोनी आन । काहीच नसे सर्वथा ।।४६।। ऐसी वृत्ती जयांची पूर्ण । म्हणोनि साधिले समाधान । ज्या समाधानाची खूण । चित्त एकाग्रही असे ।।४७।। चित्तैकाग्र्य समाधान । सद्गुरुंनी साधिलेसे पूर्ण । जन साधिती समाधान । ते समाधान नांवाचे ।।४८।। जनांचे समाधान नावाचे । संतांचे हरिनामाचे । हरिनामाचे साधिल्या साचे । लागे मोक्षाची तळमळ ।।४९।। ऐसी संपूर्ण तयारी । जाहली सद्गुरुंचे अंतरी । वर्तता सर्व व्यापारी । नाही कोणा कळो आली ।।५०।। मोक्ष कैसा मिळेल । आपणासी

कोण देईल । ऐसे अंतरीचे बोल । अंतरी उठों लागले ॥५१॥ विचार करिती आपुले मनी । कैसा भेटेल देव धनी । कोण सोडवील बंधनातूनी । मार्ग कोण दाविल ॥५२॥ ये रिती चालिले चिंतन । मनासी लागे तळमळ खूण । पुढे काय वर्तले जाण । ते पुढील अध्यायी वर्णिन ॥५३॥ पुढील अध्यायीची कथा । असे रसाळ सर्वथा । जे आयकिता चित्ता । समाधान लाधेल ॥५४॥

स्वस्तिश्री हनुमद्गुरुचरित्रबोध-सार । शमदमादि साधन वर्णन सुमन सुंदर । अर्पोनिया श्रीगुरुचरणावर । पंचमाध्याय संपविला ॥



इतिश्री हनुमद्गुरुचरित्र- बोधसारे पंचमोध्यायः

# षष्ठ अध्याय

।। श्रीगणेशायनमः ।।

जय जयाजी सद्गुरुस्वामी । नवल कृपा केली तुम्ही । म्हणवूनी प्रवर्तलो धामी । आपुले चरण- वंदना ।।१।। चरणी वंदोनी सादर । मागणे मागतो जोडोनी कर । आता पुढील कथा- विस्तार । बोलवी मम वाचे दयाळा ।।२।। तव सद्गुरु म्हणती पाही । या बोलाचे कारणचि नाही । चरित्र- कथा प्रगटेल हृदयी । पुढील वर्णन चालवी ।।३।। ऐसे आयकिता उत्तर । मन आनंदित झाले थोर । पुढील कथा- विस्तार । एकाग्र चित्ते आयकावा ।।४।। नित्यानित्यविवेक खूण । इहा- मुत्र- फलभोग- विराग जाण । शमदमादि षट्- संपत्ति साधून । सद्गुरु मुमुक्षुत्वा पावले ।।५।। बाह्य व्यवहार चालविती सकळ । परी अंतरी विचार एकचि केवळ । कोण दाखवील घननीळ । मोक्ष- मार्ग आपणा ।।६।। येता जाता कार्य करिता । मनी विचार हाचि सर्वथा । खरे समाधान चित्ता । कोण आणून देईल ।।७।। जन्मा आलियाचे कारण । पाहावे देवाचे चरण । त्या देवासी दाखवील कोण । कैसा दिसेल आपणा ।।८।। ये रीति विचार साधन । अंतरी चालले सतत जाण । मायिक आशा आपण होऊन । मनातोनी निघाल्या ।।९।। आशा- बद्ध असती जन । तैसे दाविती

बाहेरून । परी अंतरी वैराग्याची खूण । असे परिपूर्ण बाणली ॥१०॥ निराशा म्हणजे नव्हे नैराश्य । ते वोळखोनी घ्यावे मनास । नैराश्याची खूण जगास । सद्गुरु- वाचूनी कळेना ॥११॥ निराश होवोनी बैसती । नैराश्य प्राप्त झाले ह्मणती । ऐसीयासी भगवत्प्राप्ती । कदा काळी घडेना ॥१२॥ निराश अंतरी जाहला । धड संसारही साधेना त्याला । तो केवि आपणाला । परमार्थ साधू शकेल ॥१३॥ सद्गुरुंनी खरे नैराश्य साधिले । जे सर्व आशा निरसोनी अंतरी उरले । उरले त्यासी नाम दिधले । मोक्षोमे भूयात् इतीच्छा ॥१४॥ पाहोनी पाहती ना बाहेरी । पाहोनी पाहती अंतरी । मोक्षप्राप्ती देवभेटी सत्वरी । पूर्ण कैसी होईल ॥१५॥ सदा अंतरी खळबळ । मनाची चाले हेचि चळवळ । की मोक्ष दाते सद्गुरु दयाळ । कोठे भेटतील मज लागी ॥१६॥ सदा चित्ताचे चिंतन । सद्गुरु शोधनी असे जाण । काया वाचा मने करून । सद्गुरुशोधन चालिले ॥१७॥ याविण नसे दुसरा विचार । परी सोडती ना गृह- व्यवहार । अंतरीचा अंतर- विचार । अंतरी गौप्य धरिलासे ॥१८॥ आंत बाहेरी तळमळ । मनासी हेचि कळकळ । की सद्गुरुराज दयाळ । कधी भेटतील मजलागी ॥१९॥ जैसे माशासी जगणे जीवन । आणि राहण्यासीही

लागे जीवन । तैसी मन इंद्रिये असती तगून । सद्गुरु प्राप्तीचे इच्छेने ।।२०।। जीवना वेगळी मासोळी । तैसे अंतर तळमळी । म्हणोनी योग्य वेळी तात्काळी । सद्गुरुंचा शोध कळो आला ।।२१।। की चिमडक्षेत्रस्थानी । सद्गुरुराज असती जाणी । देव प्रत्यक्ष दाविती नयनी । ऐसी अद्भुत करणी जयांची ।।२२।। नाही कोणी पाहिला । नाही कोणी आयकिला । ऐसा देव- देव दाविती डोळा । तेचि सद्गुरु जाणावे ।।२३।। ऐसा जयांचा अधिकार थोर । श्रीरामचंद्रराव यरगट्टीकर । ऐसे कळता साचार । अंतरी आनंद दाटला ।।२४।। इंद्रिये विसरली भान । मनास स्फुरेना मनपण । देहातोनि चित्त निघोनि जाण । गुरुचरणासन्निध पातले ।।२५।। आनंदासी आनंद झाला । लाभासी लाभ जोडला । आता ठेवा हाती आला । ऐसे गुरुरायासी वाटले ।।२६।। लवण विरावे सागरी । की वायु आकाशाभीतरी । तैसे सर्वस्वेसी येवोनि सत्वरी । सद्गुरु- चरणी मस्तक ठेविले ।।२७।। सद्गुरुराज त्रिकाळ- ज्ञानी । ओळखिली यांची साधन- करणी । जैसा आकाशात तरणी । ऐसा जयांचा अधिकार ।।२८।। आकाशात चमके वीज । तैसे पाहिले शुद्ध बीज । मग बोलती काय सहज । असे इच्छा अंतरी ।।२९।। मग धरुनी चरण- कमळा ।

काय बोलती वेळोवेळा । मज देऊनी आपुला डोळा । देव- देव दाखवावा ।।३०।।
अनुग्रह करावा मजवर । जेणे उकलोनि अंतर । मी निःसंदेह निरंतर ।
स्वानंद साम्राज्य भोगेन ।।३१।। मनी थोर धरिली आस । हे कळोनि आलेसे
मम मनास । परी आपुले चरणसामर्थ्यास । जाणोनि हेचि मागतसे ।।३२।।
देई देईगा दयाळा । इच्छा पुरवी गा कृपाळा । तुज वाचोनी कळवळा ।
आणिका कोणा येईल ।।३३।। तू माय मी बाळक जाण । माझे करावे रक्षण ।
ह्मणोनी विनवूनिया गुरुचरण । दृढ धरोनी राहिलो ।।३४।। राम प्रगटोनी
भूवरी । तेचि रामचंद्रराव अवतारी । हनुमंत हनुमानरूपे वोळखोनी सत्वरी ।
स्वहस्ते उठवोनी आलिंगन दिधलेसे ।।३५।। मस्तकी ठेवोनिया कृपा- कर ।
नामानुग्रह दिधला सत्वर । भेटविला रघुवीर सुंदर । राम हनुमान एक
जाहले ।।३६।। जळ मिसळे जळा भीतरी । आकाश आकाशा माझारी ।
तैसे गुरु शिष्य दोन देह परी । अंतरी एक होवोनि राहिले ।।३७।। आनंद
आनंदी मिळाला । सुखे सुखात प्रवेश केला । प्रकाश प्रकाशात प्रगटला ।
तैसा शिष्य गुरुपदी मिळाला असे ।।३८।। गुरुंना झाला आनंद । शिष्या
केला आनंदकंद । तो प्रसंग वर्णाया विशाद । बुद्धि माझी असमर्थ ।।३९।।

अध्याय सहावा

वेदादिक भागले । तेथें अल्प बुद्धीचे काय चाले । ह्मणवुनि सद्‌गुरुंची वंदोनि पाउले । पुढील वर्णन करितो ते ऐका ।।४०।। सद्‌गुरु- कृपा संपादिली । वृत्ति आनंदित जाहली । येवोनि गृहव्यवहार स्थिती चालविली । अंतर साधनी राहोनी ।।४१।। येणे रीति वर्तता संसारी । गुरु-दर्शना यावे वरचेवरी । साधनाभ्यासे कृपा खरी । सद्‌गुरुंची संपादिली ।।४२।। जया कृपेचे महिमान । ब्रम्हादिकांसी वर्णवेना जाण । ती संपादोनि भगवान । वश केला जयांनी ।।४३।। सर्वस्व वाहिले गुरुचरणी । काय सांगावी त्यांची करणी । गुरु शिष्य अन्योन्यपणी । एक रूपे वर्तती ।।४४।। रामचंद्रराव गुरु महाराज । मुधोळास एकदा आले असता सहज । वंदोनियां त्यांचे चरणरज । सद्‌गुरु आपुले गृही बोलाविती ।।४५।। भोजना यावे आपुले घरी । ऐसे विनविती वारंवारी । सद्‌गुरुराज दयाळु अंतरी । येतो म्हणोनि बोलिले ।।४६।। मग आनंद झाला थोर । घरी येवोनि कळविले सत्वर । सर्व व्यवस्था होवोनि तत्पर । अति उत्तम केलीसे ।।४७।। महाराज आले आपुले घरी । पाहोनि सर्वां आनंद भारी । सद्‌गुरु आनंदसागरा माझारी । पोहू लागले आनंदे ।।४८।। स्वागतादि नमस्कार । भोजनादि सर्व उपचार । यथासांग प्रेमे झाले साचार । तेणे

महाराज संतोषले ।।४९।। घरची गरिबीची स्थिती । पाहुणचार केला उत्तम रीति । काय द्यावे महाराजांप्रती । सद्गुरू विचार करिताती ।।५०।। नुकताच महिन्याचा पगार देख । आला तो होता शिल्लक । विचार ठरविला निश्चयात्मक । तो महाराजांना अर्पण करावा ।।५१।। पुढे काय खावे महिनाभर । याचा सर्व सोडिला विचार । गुरुपदी सर्वस्व ज्याचा भार । तयासी ही चिंता उरेना ।।५२।। महाराज जाण्या निघाले बाहेरी । मस्तक प्रेमे ठेवोनि चरणावरी । सर्व पगार तयांचे करी । सद्गुरूंनी ठेविला ।।५३।। प्रेमे सर्वस्व दिधले । ते महाराजांनी स्वीकारले । करावया शिष्याचे भले । काय बोलिले ते ऐका ।।५४।। मग त्यातील दोन रुपये देऊन । ह्मणती हणमंतराव ऐके खूण । हे नीट ठेवी करोनी जतन । प्रपंच परमार्थ पूर्ण करतील ।।५५।। दोन रुपये देवोनी । प्रपंच परमार्थ पूर्ण केले ज्यानी । ऐसी सद्गुरूंची करणी । उणे नाही ठेविले ।।५६।। दिला आशीर्वाद थोर । भाग्य वाढेल अपरंपार । संपत्ती साधन प्रकार । दोनी परिपूर्ण वंशी राहतील ।।५७।। असो साधुनी मुमुक्षुता । जयांनी साधिली सार्थकता । तयांचे साधन- संपत्तीची कथा । पुढील अध्यायी वर्णिन ।।५८।। तो वर्णन प्रसंग सुंदर । अतिरम्य मनोहर । पावन करील अंतर । सद्भावेसी

श्रवण करिता ||८१||

स्वस्तिश्री हनुमद्- गुरुचरित्र- बोधसार | गुर्वनुग्रहकृपाशीर्वाद वर्णन सुमन सुंदर | अर्पोनिया श्रीगुरुचरणावर | षष्ठाऽध्याय संपविला ||

इतिश्री हनुमद्गुरुचरित्र- बोधसारे षष्ठोऽध्यायः ||

# सप्तम अध्याय

।। श्रीगणेशायनमः ।।

जय जयाजी सद्गुरुमूर्ती । वाचे वर्णवेना तव कीर्ती । मज देवोनिया स्फूर्ती । पुढील चरित्र बोलवावे ।।१।। आपुली होता कृपादृष्टी । मग कायसी चिंतेची गोष्टी । होता पर्जन्याची वृष्टी । पीक अपार पिकेल ।।२।। म्हणोनिया चरणावर वारंवार करितो नमस्कार । तव सद्गुरु बोलती सत्वर । पुढील चरित्र वर्णवि ।।३ ।। महाराजांचा अनुग्रह होता । चालविली सद्गुरुंनी साधन सिद्धता । जरी पदरी पुण्य असेल सर्वथा । तरीच जे प्राप्त होईल ।।४।। जगामाजी साधन प्रकार । आहेत अनंत अपार । परी जे भेटवील परमेश्वर । ते साधन असे निराळे ।।५।। नाना साधने साधिती । साधोनिया पस्ताविती । परी मुख्य साधनाची स्थिती । देहा बाहेर नसे की ।।६।। देहा बाहेरील साधने । अंतर साधनासी सोडोनी करणे । तरी हृदयस्थासी जाणणे । हे कैसेनी घडो येईल ।।७।। जो प्रांत कळला नाही मनासी । मन गेले नाही त्या ठायासी । तरी तेथील अनुभवासी । ते कैसेनी घेऊन येईल ।।८।। म्हणोनी अंतरीचे साधन । सद्गुरु- कृपेवीण नकळे खूण । जे साधिलिया भगवान । आपण स्वये भेटतसे ।।९।। थोर सद्गुरुंचा मामला । तो कळोनि येईल

सत्शिष्याला । अन्य कळेना कोणाला । नाना प्रयत्न करोनी ।।१०।। नव्हे नव्हे तो प्रयत्न । तया काय बोलती यत्न । वृथा काळापहरण । अज्ञपणे होत असे ।।११।। म्हणोनी सद्गुरुपदी जे जडले । तयासीच साधन कळो आले । कळेवीण आकळता भले । कैसे कळो येईल ।।१२।। ऐसे जे मुख्य साधन । ते महाराजांची कृपा संपादोन । मिळविले सद्गुरुंनी पूर्ण । त्या साधनी अखंड राहती ।।१३।। अखंड साधनी राहून । जे गेले त्रिगुणाचे पैल जाण । ऐका तीन गुणांची स्थाने । गुरु- कृपानुग्रहे आक्रमिती ।।१४।। स्वाधिष्ठानी रजोगुण । नाभिप्रदेशी सत्वगुण । अनुहतस्थानी तमोगुण । ही स्थाने उल्लंघोनी पैल जाती ।।१५।। यातुनि जो पैल गेला । तोचि बोलिती ज्ञानी भला । सद्गुरुंनी मार्ग आक्रमिला । येणे रीति गुरुकृपे ।।१६।। उल्लंघोनी कैसे जावे । हे गुरुकृपेवीण न कळे बरवे । गुरुकृपे कळो येईल स्वभावे । सहज साधनी राहता ।।१७।। चौथा गुण असे निराळा । ते ठायीची अगम्य लीला । अखंड स्फुरण ते वेळा । रामनाम हेचि राहत असे ।।१८।। येणे रीति अखंड नाम-स्मरण । चालवोनी करिती गुरुमार्ग आक्रमण । जो मार्ग आक्रमण्यासि जाण । थोर थोरही भागले ।।१९।। येथे नाही बाह्य थोरपणाचे

काम । गुरुभक्ती पाहिजे परम । तरीच कळो येईल वर्म । संत मार्ग कैसा आक्रमिती ।।२०।। त्रिकूट स्थानाचे वर्णन । काय सांगू तेथील महिमान । साधका चार- लिंग स्थान । पीत प्रकाश युक्त असे ।।२१।। उल्लंघिती त्रिकूटाचे स्थान । आकळिती मन पवन । देही मुख्य मन पवन । हे तो सर्व जाणती ।।२२।। मन पवन चाले सैराट । तो वरी कैसी मोक्षवाट । हृदयी नाभिस्थानी मन पवन स्पष्ट । नाकळता सर्वही आडताती ।।२३।। मन पवन आकळिता । निघती विषयांतोनि सर्वथा । पंच ज्ञानेंद्रियांची विषय- कथा । नुरेचि सर्वथा अंतरी ।।२४।। मन पवन स्थिर होता । सहज साधनी अखंड स्थिरता । जेथे नुरे विस्मरणाची वार्ता । अखंड प्रभुस्मरणी चित्त वसे ।।२५।। असो येणे रीति करोन । मार्ग आक्रमिती गहन । पुढील पश्चिम मार्गाचे वर्णन । एकाग्र चित्ते ऐकावे ।।२६।। त्रिकूटा पासूनिया वर । पश्चिम मार्ग चालिला सुंदर । जो मार्ग सहज सद्गुरुवर । अखंड साधनी आक्रमिती ।।२७।। पश्चिम मार्गे पुढे जाता । श्रीहाटस्थान लागे सर्वथा । ये स्थानीची अपूर्वता । पीत प्रभा लखलखीत ।।२८।। गुरुलिंगाचे हे स्थान । येथील प्रवेशाची खूण । सूक्ष्म देह येईल कळोन । ज्या योगे स्थूल देह

वर्ततसे ॥२९॥ संपले वैखरीचे कार्य । मध्यम वाचा मुजोनि जाय । तेजस स्वरूपाची कळे सोय । जेणे सामीप्य स्वरूपी साधका ॥३०॥ येणे रीति अखंड स्थिरता । कळे सहज प्राणायामाची कथा । जे सद्गुरुकृपेवीण सर्वथा । कोणासही कळेना ॥३१॥ ऐशा साधनी राहूनि केवळ । पुढे मार्ग आक्रमिती गोल्हाट मंडळ । तेथे शिव बिंदुरूपे असे केवळ । साक्षात्कार स्वरूपी ॥३२॥ सर्वत्र श्याम तेज असे । बुद्धि श्याम स्वरूपी वसे । पश्यंती वाचा विरतसे । परे माझारी सर्वथा ॥३३॥ प्राण प्रवेशे ईश्वरी । ऐसी असेल येथील थोरी । गुरुकृपे साक्षात्कारी । असती तयासी कळो येईल ॥३४॥ साधक स्वरूपाकार होय । ऐसा येथील अनुभव पाहे । तो अनुभवोनी गुरुराय । पुढील मार्ग आक्रमिती ॥३५॥ पुढे औट- पीठस्थान । अनुहत ध्वनी तेथील खूण । परमेश्वर महेश्वररूपी जाण । जगदेव स्वरूपी दिसतसे ॥३६॥ तेथील प्रभा नीलवर्ण । ज्यातून सर्व प्रकाशाची खूण । त्याची तेथील ओळखण । पूर्णत्वेसी होत असे ॥३७॥ परा वाचा प्रत्यक्ष । स्वये उरवोनी नुरवी साक्ष । जेथे अन्य बोलण्याचा पक्ष । सर्वस्वेसी उरेना ॥३८॥ येथे आनंद त्रिगुणातीत । तुर्यावस्था अंतर्गत लाधे अनंत । चित्त निर्विकार होऊनी प्रवेशात । निर्विकार

स्वरूपी ।।३९।। हाचि सायुज्यतेचा प्रांत । चित्त चैतन्यी समरस होत । याचा अनुभव घेवोनी सत्य । सद्गुरू पुढील मार्ग आक्रमिती ।।४०।। पुढे भ्रमर-गुंफा अगोचर । स्थानी प्रवेशती सद्गुरूवर । जे ठायी सद्गुरूकुमर । प्रवेशती अत्यादरे ।।४१।। सद्गुरूंचा प्रसाद पूर्ण । प्रसाद लिंगाचे दर्शन । वेदांचे सूक्ष्मत्व गहन । अनुभवा ये स्वानुभवे ।।४२।। वेद मूक होवोनी बोलती पाही । ते रहस्य येथे कळो येई । ऐसी अनुभवाची सोयी । गुरूकृपेसी सर्वथा ।।४३।। ध्यान ध्यानात मिळोनी । पावे अवस्था उन्मनी । आकाश विरे स्वरूप विवरस्थानी । अनिर्वाच्य वाणी स्फुरतसे ।।४४।। वाचे विरहित वाचा । शब्द- रहित शब्द साचा । ऐसा घोष गुरू नामाचा । अखंडित अखंडत्वे ।।४५।। आकार निराकारी वसे । गुरूदेव ज्ञानस्वरूपी कसे । अनुभवोनिया उन्मन सौरसे । पुढील स्थानी प्रवेशती ।।४६।। तेचि ब्रह्मरंध्राचे स्थान । महान् स्वरूपाचे दर्शन । जे ठायी अनुहतादि घोष गहन । स्थिरावती सहजेचि ।।४७।। सहज सहजी प्रवेशाले । निश्चल निश्चली स्थिरावले । अखंड अखंडित ठेले । अखंड होवोनी सर्वथा ।।४८।। असोनि नसणे नसोनि असणे । याची खूण अंतरी बाणे । बाणोनी जाणेना बाणणे । न बाणणे उरेना ।।४९।।

प्रकाशात परमज्योती । कोटी सूर्य तळपती । कोटी चंद्र प्रकाशती । शीतळपणे ॥५०॥ तेथोनि पुढे निरामय निर्गुण । तेथे प्रवेशती सद्गुरुनिधान । जये ठायीचे वर्णन । करू जाता वाचा नुरतसे ॥५१॥ डोळा पाहावे श्रवणी ऐकावे । तो पाहणे ऐकणे लीन व्हावे । स्पर्शावे ऐसे म्हणावे । तो स्पर्शत्व उरेना ॥५२॥ जेथे बोलण्याचा प्रांत । न उरेचि सर्वत्र शांत । ते ठायीचा एकांत । एकांतासी कळेना ॥५३॥ तेज तेजी सामावले । तेज स्वस्वरूपी उरले । तेजोदृष्टीत अनुभवा आले । गुरुकृपे करोनी ॥५४॥ ते तेज शांत अनंत । जेथे नुरती सूर्य चंद्रांचे प्रांत । अखंड ओतप्रोत सदोदित । गुरुकृपे अनुभविती ॥५५॥ अनुभवे अनुभवा अनुभविले । अनुभवे अनुभवी राहिले । ये रीति साधन पूर्ण केले । पूर्णत्वेसी परिपूर्ण ॥५६॥ व्यवहार चालविती सकळ । परी अंतरी परिपूर्ण निश्चल । सदा चिंतिती गुरुचरण- कमळ । लौकिकाचार पाळोनी ॥५७॥ ये रीति वर्तत असता । न चुकविती प्रारब्धकथा । नोकरी सोडोनी सद्गुरुनाथापाशी चिमडासी पातले ॥५८॥ तो वेळ होता बाराचा सुमार । महाराज बैसले होते विहिरीवर । जेवणापूर्वी अन्न घालण्या सत्वर । माशालागी नित्याचे ॥५९॥ वळोनि सहज पाहती मागे । तो हणमंतराव

असती उभे । जैसे रामचंद्रापुढे उगे । हनुमान हात जोडोनी ।।६०।। मग अंतर ओळखून । महाराज सहज बोलिले वचन । माझ्यालागी जाण अन्न । कोण देतो पोटासी ।।६१।। तोचि तुझे करील रक्षण । चिंता करणे काय कारण । ऐसे बोलोनि आपुले सवे जाण । भोजना घेवोनिया आले ।।६२।। दोघांचे भोजन जाहलियावरि । हनुमंतराव ऐसी हाक मारिली सत्वरी । म्हणती तुझिये भाग्याची थोरी । अपरंपार वाढेल ।।६३।। ऐसा आशीर्वाद होता जाण । सद्गुरूंनी दृढ धरिले महाराजांचे चरण । मग मस्तकी हस्त ठेऊन । ऊठ ऐसे बोलिले ।।६४।। उठोनिया वारंवार । नमस्कार करिती सादर । गुरूभक्तीचा महिमा थोर । साधन- शांती लाधली ।।६५।। मन जडले हरिकीर्तनी । अखंडित अनुदिनी । पुढे कैसी वर्तली करणी । ते पुढील अध्यायी सांगेन ।।६६।। ते कथा अति सुरस । पुरवील जीवीची आस । म्हणोनी स्थिर करोनी मानस । एकाग्र चित्ते परिसावी ।।६७।।

स्वस्तिश्री हनुमद्- गुरुचरित्र- बोधसार । साधनमार्ग वर्णन सुमन सुंदर । अर्पोनिया श्रीगुरुचरणावर । सप्तमाध्याय संपविला ।।

इतिश्री हनुमद्गुरुचरित्र- बोधसारे सप्तमोध्यायः

# अष्टम अध्याय

।। श्रीगणेशायनमः ।।

जय जयाजी सद्गुरुनाथा । तव चरणी ठेवितो माथा । तव चरित्र वर्णनाची कथा । पुढे चालवी गा दयाळा ।।१।। तव मनी येता पाही । अशक्य असे काहीच नाही । अमृताची पाणपोई । कीर्तन चरित्र आपुले ।।२।। तो कीर्तन-साधन विचार । मम मुखे बोलवी साचार । ब्रह्मादिकांसी ज्यांचा पार । न लागेचि सर्वथा ।।३।। हरिगुणनाम- संकीर्तन । हे तो सर्व साधनांचे साधन । जे साधिता भगवान । आपण स्वये वश होय ।।४।। ते कीर्तन- वर्णन सुरंग प्रसंग । मम मुखे वदवी चांग । जेणे फिटती जन्म- मरणाचे पांग । श्रवण करिता जीवांचे ।।५।। तव सद्गुरु म्हणती परियेसी । आता विलंब काल्याची । वर्णावे कीर्तन- प्रसंगासी । जे असेल तव अंतरी प्रगटविले ।।६।। ऐसा होता सद्गुरुंचा वर । प्रसन्न झाले मम अंतर । श्रोतेहो ऐका चतुर । ते कीर्तन कैसे असे ।।७।। मागील अध्यायी साधन वर्णिले । जे सद्गुरुंनी साधिले । त्याचे फळ अंतरी प्रगटविले । ते हे हरिगुण-कीर्तन ।।८।। ऐसी कीर्तनाची थोरी । कीर्तनी स्वये प्रगटे हरी । ते कीर्तन गुरुकृपेसी निर्धारी । सद्गुरुंचे हृदयांतरी प्रगटविले ।।९।। शांतीने भरले अंतर । गुरुकृपेचा धवल

सुधाकर । स्वानुभव-रवि-प्रकाश सुंदर । एकाच वेळी प्रगटविले ।।१०।। तेथे स्वयें सद्गुरुवर । कीर्तन करिती अखंड मनोहर । जये ठायी प्रवेशती सुरवर । संत सज्जन श्रवणासी ।।११।। ठाय असे देहाभीतरी । गुरुभक्त जाणती नवलपरी । देव भक्तांमधील अंतर दुरी । होऊनी एक होताती ।।१२।। तो ठाय सुमनोहर । प्रसन्न होय जेथे अंतर । अखंडित निरंतर । कीर्तन अखंड स्वयें चाले ।।१३।। तो ठाय गुरुकृपें वहिला । सद्गुरुंनी असे साधिला । तेथे कीर्तनरंग रंगविला । श्रीरंग प्रगट करोनी ।।१४।। तो ठाय न कळे कोणासी । म्हणोनी अंतरला हृषीकेशी । ते ठायीची कीर्तन- महिमा ऐसी । जे ठायी देव स्वयें नाचे ।।१५।। देव नाचे तेथे इतरांचे । काय महिमान असे साचे । ते ठायी सद्गुरुराज अमुचे । कीर्तनाकार जाहले ।।१६।। कीर्तनस्वरुपाकार जाहले । म्हणोनी कीर्तन रंगीं रंगले । ते कीर्तन जाणती भले । संत सज्जन ऋषीमुनी ।।१७।। नारदादि मुनिवर । ज्या कीर्तनी रंगले थोर । ते कीर्तन सद्गुरुंचे अंतर । व्यापोनिया राहिले ।।१८।। अंतर व्यापूनी राहिले । तेचि बाहेर प्रगटले । दुष्काळात सुकाळले । आमचे सांगली ग्रामात सकळासी ।।१९।। प्रथम कीर्तन- प्रसंग सुंदर । साधिला महाराजांचे समोर । तोचि वृक्ष फोफावला थोर । झाला विस्तार जगभरी ।।२०।। कीर्तन ऐकोनी सुंदर । महाराज प्रसन्न झाले थोर । दिधला

कीर्तनठेवा निरंतर। तोचि लुटिला सद्गुरुंनी ।।२१।। लक्ष्मीबाईअक्कांचे कृपेकरून। सर्पदंशातून वाचले जाण। तेथोनि समर्पिले पंचप्राण। सद्गुरुसेवे लागोनी ।।२२।। कीर्तन- सेवा करिता साचार। सौ. मातुश्री लक्ष्मीबाईंचा आग्रह पाहोनी थोर। प्रसन्न झाले माईसाहेबांचे अंतर। गुरुपादुका प्रसाद दिला असे ।।२३।। कीर्तनाचा नटनाच। साधोनी यमास पाडिला पेच। कीर्तनाचा महिमा साच। जगामाजी प्रगटविला ।।२४।। नामदेव- तुकारामादि भक्त प्रेमळ। ज्यांनी केला अखंड कीर्तनाचा सुकाळ। त्या अखंड कीर्तनाची कळ। सद्गुरुंनी अखंड चालविली ।।२५।। संतराज तुकाराम। जगासी दावाया भक्ति- वर्म। अवतार घेतला परम। धरोनी नाम नारायण ।।२६।। त्यांचेनि कृपे कीर्तन अखंड चालविले। नामामृत जगासी पाजविले। ऐसे कीर्तन साधिले भले। जे दुर्लभ असे जगासी ।।२७।। दुर्लभ तेचि केले सुलभ। जेणे जोडे पद्मनाभ। तेणे जीवा झाला खरा लाभ। श्रीरघुनाथप्रिय साधु- कृपे ।।२८।। ज्यांनी ज्यांनी कीर्तन आयकिले। तयांसी हे अनुभवा आले। ऐसे नाही आयकिले। आजवरी कीर्तन ।।२९।। कीर्तन प्रेमामृताची धार। जे जगासी दाविले साचार। ऐकता चाकाटती लहान थोर। गरीब श्रीमंत सर्वही ।।३०।। सज्ञान अज्ञान सर्वजणा। हाचि अनुभव असे जाणा। ऐसा नाही देखिला राणा। जो

कीर्तनी सुखदुःख विसरवी ।।३१।। एकदा सद्गुरुंचे घरी राहोनी कीर्तनासी । आले होते एक संन्यासी । तयानी आपुले मानसी एके दिवशी । ऐसे होते धरियेले ।।३२।। आज कीर्तनाचे समयी । सांगा म्हणावे तत्वमसि वाक्या विषयी । परंतु ऐन वेळेसि पाही । सांगावयासी विसरले ।।३३।। परी नवल चमत्कार । त्या दिवशीचा प्रकार । तत्वमसि- महावाक्य- विचार । सद्गुरुंनी संपूर्ण सांगितला ।।३४।। ऐसा अनुभव सकळासी । म्हणोनी लीन होती चरणासी । गुरुकृपेची महिमा ऐसी । सद्गुरु सर्वांतर जाणती ।।३५।। असो संन्याशी यांची मनिंची । शंका फेडिली तत्वमसीची । खूण दिली बोलण्याची । जाते वेळी ते ऐका ।।३६।। संन्यासी द्रव्य दुसऱ्या जवळ ठेवण्यासी । देताना म्हणत ठेवा तत्वमसि । ऐसेच सद्गुरुंचे घरी राहिले वेळेसी । तत्वमसि ठेवा बोलिले होते ।।३७।। तत्वमसीत घालोनि भर । पुडी ठेविली त्यांचे हातावर । म्हणती तत्वमसि कळली का साचार । वाढली की नाही ते पाहावे ।।३८।। उलगडोनी पाहाती संन्यासी । तो दुप्पट द्रव्य दिसले त्यासी । सद्गुरु म्हणती दिधले तुम्हासी । तत्वमसि कळावया ।।३९।। म्हणोनी केला नमस्कार । संन्यासीयासी आश्चर्य वाटले थोर । बोलिले ऐसा कीर्तन- प्रकार । नाही आजवरी पाहिला ।।४०।। थोर सद्गुरुंचे कीर्तन । रंग प्रगटती कीर्तनी आपण

होऊन । त्या कीर्तनाचे महिमान । कोणे रीति वर्णावे ।।४१।। साधन शांती अंतरी भरली । त्यातुनी कीर्तन भक्ती प्रगटली । त्या कीर्तनाची बोली । जाणती साधु सज्जन ।।४२।। अवघा बोले चाले हरी । ज्याची कथा तोचि करी । हे वचन सद्गुरूवरी । आपुले कीर्तनी सत्य करोनी दाविले ।।४३।। एकदा चिमडास कीर्तनी सहज । प्रगटले श्रीरेवणसिद्धमहाराज । सकळांनी पाहिले तेज । ऐसे गुज कीर्तनाचे ।।४४।। थोर शांतीचे सागर । गुरूकृपेचे आगर । कीर्तन करिती निरंतर । परी दुर्जना काय तयाचे ।।४५।। एके दिवशी या मंडळींनी । ऐसे योजुनी ठेविले मनी । कीर्तनाचे वाटेवरी जाणी । सराटे पसरोनी ठेवावे ।।४६।। त्याप्रमाणे सराटे पसरिले । कीर्तन संपता लोक बाहेर आले । तो सर्वांचे पायी बोचू लागले । काटे तेव्हा तात्काळ ।।४७।। हे काय म्हणोनी पाहाता सत्वर । सराटे दिसती सर्वत्र । हा प्रकार पाहोनी साचार । दुर्जन अंतरी तोषले ।।४८।। दुसरे दिवशी ओळखोनी त्या लोकांस । करावे काही शिक्षेस । लक्ष्मीबाई साहेब सांगती तयास । सद्गुरू काय बोलिले ।।४९।। शांती कशी धरावी जाण । याची त्यांनी द्यावया शिकवण । हे कृत्य केले असे जाण । आम्हा सकळा कारणे ।।५०।। म्हणोनी धरोनि शांतीस । न करवावे काही शिक्षेस । हेचि योग्य असे आपणास । ऐसे

अ
ध्या
य
आ
ठ
वा

सद्गुरु बोलिले ।।५१।। सद्गुरु शांतीचे सागर । तया कैसा सुचेल अन्य विचार । असो ऐशा प्रकारे निरंतर । कीर्तन अखंड चालविती ।।५२।। व्याधी उपाधी आली जरी । कीर्तन चालविती निरंतरी । अखंड कीर्तना भीतरी । खंड कैचा पडेल ।।५३।। अखंड कीर्तन संतांचे । गुरुभक्त महिमान जाणती त्यांचे । नवल देणे गुरुकृपेचे । किती म्हणोनी वर्णावे ।।५४।। ज्यांचे कीर्तनी अद्वय भजन । चाले अखंडित श्रवण । ऐसी वाजतसे करताळ खूण । ते अखंड कीर्तन संतांचे ।।५५।। ज्या कीर्तनी भगवान । व्यापुनी राहे हृदय-भुवन । ऐसी कीर्तन- महिमा जाण । अखंड त्यांनी चालविली ।।५६।। ज्या कीर्तनी प्रेम- उमाळा । अखंड येई वेळोवेळा । त्या कीर्तनाचा सोहळा । कोण वर्णू शकेल ।।५७।। पायास सूज आली होती । कीर्तन बैसोनी करिती । परी कीर्तनरंगी रंगता वृत्ति । उठोनि कीर्तन बोलावे ।।५८।। ऐसा अखंड कीर्तनाचा रंग । तो कोण करील बेरंग । स्वये आपण श्रीरंग । ज्या कीर्तनी रंगतसे ।।५९।। एकदा सद्गुरुंचे कीर्तनी । नित्याप्रमाणे बत्ती ठेविली लावोनि । परी ते दिवशी जाणी । तेल कमी होते तयात ।।६०।। कीर्तनास सुरवात झाली । बत्तीची ज्योत कमी होऊ लागली । मंडळी गडबड करु लागली । दुसरा दिवा आणावयासी ।।६१।। सद्गुरु विचारिती जाण । गडबडीचे काय कारण ।बत्तीत

तेल नाही म्हणून। ऐसे सद्गुरुंना सांगती ॥६२॥ नसले म्हणोनी काय झाले। तुम्ही उठू नका वहिले। पुढे कीर्तन सुरू झाले। नित्याप्रमाणे वर्णन ॥६३॥ उठू नका म्हटल्यावर। मग कोण उठणार। परी श्रोते हो ऐका नवल चमत्कार। काय झाला तो पुढे ॥६४॥ बत्ती उत्तम राहिली तेवत। कीर्तन संपेतोपर्यंत। काय बत्तीची आहे मात। की मध्येचि विझावे ॥६५॥ म्हणोनी बोलिलो की कीर्तनाचा रंग। कोण करील बेरंग। हे बोलणे सत्य चांग। कैसे ते आणिक ऐकावे ॥६६॥ एके दिनी खोकल्याने बेजार। जाहले होते सद्गुरुवर। तेचि दिवशी दिवाणखान्यात कीर्तना साचार। यावे ऐसे सरकारस्वारींनी कळविले ॥६७॥ सद्गुरु बेजार फार होते जाहले। हे सकळांनी पाहिले। परी तैसेचि कीर्तना उभे राहिले। केले प्रहरभर कीर्तन उत्तम ॥६८॥ कीर्तन संपवोनी बैसले जेव्हा। सरकारस्वारींनी विचारले तेव्हा। आपण औषध घेतले केव्हा। की ज्याने खोकला नुरलासे ॥६९॥ तेव्हा बोलिले सद्गुरुवर। कीर्तन हेचि औषध सुंदर। हे सद्भावे घेईल जो नर। तो निर्विघ्न होत असे ॥७०॥ असो ऐसे कीर्तन अखंड। चालविले पडो न देता खंड। जेणे निवारे जन्ममरण-बंड। एकाग्र चित्ते आयकिता ॥७१॥ ऐसे सद्गुरुंचे कीर्तनाचे महिमान। एक की दोन सांगू प्रमाण। म्हणोनी

होवोनी चरणी लीन । कीर्तन- कथन अल्प कथियेले ।।७२।। कीर्तन करुनी चांग सुरेख । जे हरिरुप जाहले सांग देख । त्यांचे चरणी ठेविता मस्तक । कीर्तन अंतरी दावियेले ।।७३।। ऐसे कीर्तन साधोनि नित्य नेम । कैसा पूर्ण केला गृहस्थाश्रम । गृहस्थाश्रम उत्तमोत्तम । हे वर्तोनि जगासी दाविले ।।७४।। तो पुढील प्रसंग रसाळ । श्रोते ऐका होऊनी अचंचळ । जेणे चित्त होईल निर्मळ । तो पुढे वर्णिन गुरुकृपे ।।७५।।

स्वस्तिश्री हनुमद्- गुरुचरित्र- बोधसार । कीर्तन साधन प्रसंग वर्णन सुमन सुंदर । अर्पोनिया श्रीगुरुचरणावर । अष्टमाध्याय संपविला ।।

**इतिश्री हनुमद्- गुरुचरित्र- बोधसारे अष्टमोऽध्यायः**

# नवम अध्याय

।। श्रीगणेशायनमः ।।

जय जयाजी सद्गुरुवर । नमन करितो चरणी सादर । कृपा करोनी दीनावर । पुढील चरित्र बोलवावे ।।१।। आपुली कृपा होय जरी । तरीच घडेल हे निर्धारी । म्हणोनिया वारंवारी । प्रार्थितसे दयाळा ।।२।। आपुलेनी कृपा- प्रसादे । चरित्र वर्णेन मी स्वानंदे । प्रेमानंदाचिया छंदे । अत्यानंदे करोनी ।।३।। तव सद्गुरु बोलती पाही । चरित्र वर्णावे लवलाही । जे प्रगट असे तुझे हृदयी । आता विलंब कासया ।।४।। आता ऐका श्रोते जन । गृहस्थाश्रमाचे वर्णन । सद्गुरुराज दाखविती वर्तोन । तेचि आता सांगेन ।।५।। कोणते घरी राहावे । कैसा रीति वर्तावे । हे बाह्याचार न सोडोनि स्वभावे । दाविले सर्व जगासी ।।६।। कोण्या घरी सद्गुरु राहती । त्याची आयकावी स्थिती । जे घर सापडता निश्चिती । भवबंधन उरेना ।।७।। संतांचे घर सुंदर । अति रम्य मनोहर । जेथे स्वये परमेश्वर । वास करी आनंदे ।।८।। हिरेमय रत्नखचित । स्वयंप्रकाशे प्रकाशत । जेथे प्रवेशता चित्त । भगवत्पदी जडतसे ।।९।। नामघोष निरंतर । दशविध वाद्यांचा गजर । मुक्तमाळा मनोहर । शोभती आसमंतात ।।१०।। इंद्रादिक सुरवर । भोगिती स्वर्ग- भुवन सुंदर । परी तयासीही येथील विचार ।

कळो येईना सर्वथा ।।११।। गुरुकृपें कळो येईल हे घर । इतरा ते न कळे साचार । सद्गुरु-कृपा होईल जर । तरीच वास ते ठायीं ।।१२।। ऐसिया गृही सद्गुरु राहती । परी दावाया लौकिक रीति । सांगलीग्रामा मध्येचि निश्चिती । घर करोनी राहिले ।।१३।। घर जाणोनी राहिले । गृहेशाते ओळखिले । ते वास करिती ज्या गृही वहिले । ते वाईटही होतसे उत्तम ।।१४।। सद्गुरु सोबनिसांचे घरी राहिले । ते लोकांनी बाधिक म्हणोनि होते टाकिले । परी कीर्तन गजरे पवित्र झाले । निर्बाधिक उत्तम ।।१५।। ये घरी सद्गुरु वास करिती । पत्नी सद्गूणी महान्सती । माता पतीव्रतेची मूर्ती । इतर परिवारे सहित ।।१६।। प्रपंची पाहिजे सुवर्ण । तरीच प्रपंच सुखायमान । वकिली करुनिया जाण । सद्धर्मे धन मिळविती ।।१७।। धन मेळविती बहुत । खर्चही करिती अगणित । परी त्याचा व्यय करणे उचित । ही गोष्ट अवघड असे ।।१८।। आपण स्वतःचे सुखासी । द्रव्य खर्च करिती बहुवसी । परी परोपकारी वेचावे द्रव्यासी । हे तो गोष्टी अवघड ।।१९।। पूर्वीची गरिबी बहुत । आता जाहले श्रीमंत । परी या दोनी अवस्थेत । समान चित्ते वर्तती ।।२०।। द्रव्य नव्हे हे आपुले । ते देवे आपणा दिधले । ऐसे तत्व ओळखोनी भले ।

सदा सर्वदा वर्तती ।।२१।। द्रव्य बहुत मेळविले । कुळीचे सर्व कर्ज फेडिले ।
दीन अनाथांसी दिधले । कार्याकारणे परोपरी ।।२२।। परोपकार पुण्य थोर ।
तो उपकार करावा सर्वांवर । ऐसा वर्तनाचा प्रकार । व्यवहारी परमार्थ
दाविती ।।२३।। घरी आटाला वाढला थोर । नित्य पंगतीस बहुत जेवणार ।
उत्तम सुग्रास अन्न साचार । दोनी वेळेसी होत असे ।।२४।। किती येती
किती जेवती । याची कोण करील गणती । वेळी पाच पन्नास पाने घरी
जेवूनी उठती । कमती नाही कशाची ।।२५।। पूर्वी गुरूंचा मनीचा हेत ।
बोलिले होते मठ बांधवा सत्य । तो हेतू सद्गुरूंनी पूर्ण केला यथार्थ ।
चिमडास सुंदर मठ बांधोनी ।।२६।। गोरगरिब विद्यार्थी यांनी । विनंति करावी
येऊनी । तयासी भोजन घालुनी । साहाय्य करावे विद्येसी ।।२७।। पंगतीस
कित्येक वारकरी । कित्येक जेविती दरबारी । ऐसा थाट चाले परोपरी ।
सद्गुरू- कृपा- प्रसादे ।।२८।। सद्गुरू- कृपा नसेल जर । ऐसी बुद्धी
नांही होणार । कीं ज्यांनी गृहस्थाश्रमास केले थोर । आपले वर्तने करोनी ।।२९।।
धारणात् इति धर्म । हे ओळखोनी वर्म । मार्ग दाविती उत्तम । धर्म कैसा
आचरावा ।।३०।। जेणे योगे देह चाले । तो धर्मरूपी आत्मा जाणती भले ।

तरीच धर्म- कार्य वहिले । होत असे उत्तम ।।३१।। धर्म कुळाचार चालविती ।
लौकिक सर्व सांभाळिती । ऐसे वागुनियां जगती । धर्माचे वर्म दाविले ।।३२।।
धर्म करावा जाणोनी अंतर । वागणे जयाचे उदार । तरीच गृहस्थाश्रमाचे
सार्थक थोर । हे सद्गुरुराज वर्तुनी दाविती ।।३३।। दाता असावा उदार ।
हे करोनी दाविले साचार । कित्येक वेळा कित्येक प्रकार । अनेकांनी
पाहिले ।।३४।। एकदा एक ब्राम्हण । विनंती करी येवून । एकादे वस्त्र द्यावे
मी उघडा आहे म्हणून । त्यासी पाहिले सद्गुरुंनी ।।३५।। तो तेथेचि खुंटीवर ।
नवीन धोतरे होती सुंदर । ती सर्वही त्या ब्राम्हणा देवुनी साचार । नमस्कारूनी
बोळविले ।।३६।। कोणासी द्यावा पोशाख । कोणासी देती पैसे रोख । परी
कोणासी विन्मुख देख । कधीं नाही घालविला ।।३७।। एकदा येत होते
कचेरीतून । आत आले उतरोन दारातून । तो एका गरीब बिचाऱ्याने । डोकीस
घालण्या द्या म्हणोनी प्रार्थिले ।।३८।। रुमाल होता डोकीवर । जरी- काठी
किमतीचा थोर । तोचि काढुनी सत्वर । त्या गरिबासी दिधला ।।३९।। दुसऱ्याचे
दुःख पाहोन । ज्यांचे कळवळे अंतःकरण । दुसऱ्यासी दाखविती बोलून ।
मीही पूर्वी गरीब होतो ।।४०।। सद्गुरुंनी केले मला थोर । संपत्ती दिधली

थोर। त्याचा योग्य उपयोग न करिता साचार। दोष लागे मज म्हणती ।।४१।। घरा आलिया श्रीमंती। कोणा आठवेल गरिबीची स्थिती। परी आपण गरीब होतो हे वागवुनी चित्ती। सदा उपकार करावे ।।४२।। वकिली चाले उत्तम बहुत। द्रव्यही मेळविले अगणित। गोर गरीबांची कामे करुनी देत। द्रव्य न घेता तयांचे ।।४३।। शेजार- धर्म पाळावे। दुसऱ्याचे उपयोगी पडावे। चांगले कैसे वर्तावे। हे आचरुनी दाविती ।।४४।। घरिचियावरि जैशी प्रीती। तैशीच दुजियावरि करिती। भेद- अभेदाची रीति। नसे जयापाशी कदापी ।।४५।। कित्येक वेळा रात्री। गरीब येवुनि मागती अन्न द्वारी। तयासि घालावे सत्वरी। उत्तम अन्न ।।४६।। ऐसे एक ना दोन। किती वर्णन करावे गुण। विस्तारासी विस्तार भय वाढेल जाण। ऐसे महिमान सद्गुरुंचे ।।४७।। तैसीच सद्गुरु-माता आणि पत्नी जाण। दोघेही मदत करिती मनापासून। जेणे योगे सद्गुरुंचा लौकिक जाण। वाढेल ऐसेची वर्तती ।।४८।। सद्गुरु- पत्नी लक्ष्मीबाई। महान अधिकारी पाही। पतिव्रताधर्मे राही। सकळा वंद्य होउनी ।।४९।। पुत्र कन्या सद्गुणी सुंदर। सुना जामातादि संसार वाढला थोर। सर्वतोपरी संसार चालवोनि सुंदर। त्यात अलिप्तपणे

अ
ध्या
य
न
व
वा

राहिले ।।५०।। सद्गुरुंचे धाकटे बंधु देखव । नांव जयांचे पुंडलीक । बंधुप्रेम अलौकिक । लक्ष्मणा ऐसे वर्तती ।।५१।। सद्गुरुंनी नानबांसी आपुले म्हणितले । सहकुटुंब घरी ठेवोनि घेतले । तयांचे प्रेम पाहोनि जन लोक बोलती वहिले । रामदास कल्याणा ऐसे ।।५२।। असो ऐसा गृहस्थाश्रम । नित्य कीर्तने शोभतसे उत्तम । गृहस्थाश्रमी सिद्ध स्थिती परम । अखंड जयांनी साधिली ।।५३।। ते वर्णन रसाळ सुंदर । पुढे वर्णन करीन परिकर । जे आयकिता चराचर । प्राणिमात्र मुक्त होती ।।५४।।

स्वस्तिश्री हनुमद्-गुरुचरित्र-बोधसार । गृहस्थाश्रम वर्णन सुमन सुंदर । अर्पोनिया श्रीगुरुचरणावर । नवमाध्याय संपविला ।।

**इतिश्री हनुमद्-गुरुचरित्र- बोधसारे नवमोऽध्यायः**

# दशम अध्याय

।। श्रीगणेशायनमः ।।

जय जयाजी सद्गुरु दातारा। विनवीतसे जोडोनी करा। आता पुढील चरित्र-प्रकारा। वदवावे मम वाचे ।।१।। सद्गुरु चरित्र अपरंपार। ब्रह्मादिकासी न कळे पार। तेथे काय मी किंकर। आपुले कृपे सर्व वर्ततसे ।।२।। कर्ता करविता तूचि असशी। तव करणी अगोचर वाचेसी। म्हणोनिया तव चरणासी। शरण आलोसे दयाळा ।।३।। तव काय बोलती श्रीसद्गुरुवर। चरित्र वर्णाया कासया उशीर। तव हृदयी प्रगट असे साचार। वर्णन करी लवलाही ।।४।। ऐसे देता आशीर्वचन। थोर आनंदले मन। गुरुकृपेचे महिमान। गुरुभक्त जाणती ।।५।। आता ऐका श्रोतेजन। पुढील कथा मी वर्णिन। जे चरित्र अति गहन। ऐकता मन निवेल ।।६।। सद्गुरु गृहस्थाश्रमीं वर्तती। जगा दावावया नीती। परी वर्तूनिया अलिप्त असती। कमल- पत्रा- प्रमाणे ।।७।। गूळ सांडुनी गोडी घ्यावी। मीठ सांडुनी चवी चाखावी। येणे रीति सिद्ध पदवी। गृहस्थाश्रमीं साधिली ।।८।। जेथे संदेह- रहित ज्ञान। निश्चयाचे समाधान। अखंड नामानुसंधान। साधनी स्थिर होतसे ।।९।। तो सिद्ध दशेचा प्रांत। चित्त प्रपंची करूनी अनासक्त। नाम संकीर्तनी होवुनी रत।

गुरुकृपे आकळिला ॥१०॥ सिध्द स्थितीचे बोलणे । सिध्द स्थितीचे चालणे । सिद्ध स्थितीचे करणे । अघटित असे ॥११॥ जग चाले जया रीति । ती सिद्धांची नव्हे चालरीति । सिद्ध चालती कोणे रीति । ते प्रचिती श्रीरेवणसिद्धगुरुंनी दाविली ॥१२॥ श्रीमरुळसिद्ध- काडसिद्ध- कृपे । सिद्धपण झाले सोपे । जे न प्राप्त होय करिता तपे । ते साधिले अखंडित अखंडत्वे ॥१३॥ स्वतःसिद्ध वस्तू होवुनी ठेला । तोचि जाणावा सिद्ध भला । ऐसी दाविती सिद्धलीला । सद्गुरु प्रपंची वर्तत ॥१४॥ जगासी वाटे जे अशक्य । ते साधिता येते सहज शक्य । येक मनी धरिता सद्गुरुवाक्य । अनुभवा हे येईल ॥१५॥ घरी राहुनी सहज रिति । साधिता येते सिद्धस्थिती । हे आचरोनी जगाप्रती । असे सद्गुरुंनी दाविले ॥१६॥ ज्यांनी सद्गुरुंसी पाहिले । तयासी हे कळुनी आले । आपणात हे वर्तती भले । परी हे आपणाहुनी निराळे असती ॥१७॥ ऐसे जयांचे निराळेपण । कळुनी येतसे सकळा कारण । पावलोपावली जाण । जे जे पाहती तयासी ॥१८॥ सद्गुरुंचे दृष्टीस देवुनी दृष्टी । पाहता कळुनी येतसे हे गोष्टी । की यांचे चित्त न पाहे सृष्टी । मधील दृश्य पदार्थ ॥१९॥ ते कोठे तरी अंतरी । जडलेसे अभ्यंतरी । वर्तता आचार- विचारी । हेचि

स्थिती सदा असे ।।२०।। चित्त चैतन्यी समरसत । देह प्रपंची वर्तत । ऐसी सिद्ध लक्षणाची मात । शास्त्रादिक बोलती ।।२१।। ऐसे सिद्धपण समर्थ । सद्गुरुंनी साधिले यथार्थ । सिद्धचरण स्पर्शाविया तीर्थ । वाट पाहती शास्त्र बोले ।।२२।। ऐसी शास्त्रांची वचने । अनुभवा येती कारणा कारणे । ते अनुभव मनी घेणे । तरीच कळों येईल ।।२३।। एकदा या ह्मणण्याचा । अनुभव आला असे साचा । जेणे योगे शास्त्र- वचनाचा । उलगडा होय ।।२४।। शके अठराशे छत्तीसा माझारी । कृष्णेसी पाणी चढले भारी । आमुचे सांगली ग्रामा माझारी । असे सर्वत्र पसरले ।।२५।। सारखे पाणी वाढत । कमी होण्याची नाही मात । लोक हवालदील होत । चिंता वाटे सर्वांसी ।।२६।। लहानापासूनी थोरापर्यंत । सर्व झाले चिंताग्रस्त । कृष्णाबाईस प्रार्थना करीत । माते वोसरावे ह्मणोनी ।।२७।। कठीण काळ जाहल्या प्राप्त । मग देव सकळा आठवत । ऐसी आहे जगाची रीत । इतर वेळी देव स्मरेना ।।२८।। तैसीच झाली आता परी । सर्व स्तविती वारंवारी । कृष्णाबाई कोण हे तोवरी । कोण विचार करील ।।२९।। परी आता सर्वांवर । संकट येवुनी पडले थोर । पाणी उतरेना अणुभर । बहुतेक गाव व्यापिले ।।३०।। ज्यांची घरे पाण्यात बुडाली । ऐसी बरीच मंडळी ।

घरोघरी येवुनि येती राहिली । तैसी सद्गुरूंचे घरी बरीच आली होती ॥३१॥ कृष्णाबाईस प्रार्थून । घरोघरी सर्वजण । खण नारळ आणून । ओटी भरती कृष्णेची ॥३२॥ चित्त ज्यांचे प्रजेवर । राजे चिंतामणराव आप्पासाहेब थोर । तेही झाले चिंतातुर । काय करावे म्हणोनि ॥३३॥ राणीसाहेब सरस्वतीबाई । येवुनि प्रार्थिती लवलाही । पुजोनिया कृष्णाबाई । महा ओटी भरियेली ॥३४॥ येणे परी चालिला प्रकार । परी पाण्यासी पडला नाही उतार । सद्गुरूंचे घरातील प्राकार । कृष्णाबाईने व्यापिला ॥३५॥ सोप्याचे खालील पायरीस भले । पाणी येवुनि लागले । पाणी चढण्याचे प्रमाण अति झाले । सरकार वाड्यातील दिवाणखानाही व्यापिला ॥३६॥ स्टेशनात कळावर । पाणी झाले गुडघाभर । ऐसा भयंकर प्रकार । पाणी कैसे उतरेल ॥३७॥ लोक बहुत आश्रयास । आले होते सद्गुरूंचे घरास । त्यांनी प्रार्थिले सद्गुरूंस । आपण पाण्यापासी यावे ॥३८॥ स्पर्श करावा पाण्यास । म्हणजे पाणी उतरेल खास । ऐसा आहे आमुचा विश्वास । म्हणुनी चरणी लागले ॥३९॥ सद्गुरू म्हणती तयांस । कृष्णाजल स्पर्शने पुण्य सर्वांस । मग येवुनी पाय धुवुनी मार्जनास । केले कृष्णाजलाने ॥४०॥ सद्गुरूंनी स्पर्श केला । नवल चमत्कार घडोनी

आला। पाण्याने तात्काळ उतार टाकला। हळु हळु वोसक लागले ।।४१।।
सकळ लोकांची पापे अनंत। तीर्थे नाहीसी करिती समस्त। त्या तीर्थांतील
पापे समस्त। संतचरण- स्पर्शे निरसती ।।४२।। असो सद्गुरु सकळास
म्हणती पाही। ही तो देवाची नवलाई। धन्य धन्य कृष्णाबाई। आम्हा
सर्वांसी रक्षिले ।।४३।। असो ऐसे सद्गुरुवर। लोका न दाविती सिद्ध-प्रकार।
गुप्त राखोनी अंतर। जगकडी चालविती ।।४४।। रोज कचेरीसी जाती गुरुवर।
सांगतो ऐका एक नवल प्रकार। लोक निष्कारण वैर। करिती संतांचे ।।४५।।
संत अंतरी सदा शांत। अंतर राम- नामांकित। हत्ती न सोडी आपुली
गत। भुंकणे ऐकुनी श्वानांचे ।।४६।। तैसी सद्गुरुंची मनोवृत्ती। खाली पाहोनी
चालण्याची रीति। अनिष्ट मनीचे साधाया प्रती। काय करिती दुर्जन ।।४७।।
वाटेने निघाले पाहून। माडीवरून शेणगोळा जाण। दिला असे फेकून।
अंगावर नेमका पडेसा ।।४८।। अंगावर पडला आहे हे पाहून। मनात
हर्षले दुर्जन। सद्गुरुंनी वर पाहूनी ओळखिले जाण। परी म्हणाले अवचित
पडलासे ।।४९।। म्हणून घरी येवून। पोषाख दुसरा करून। कचेरीस त्वरीत
गेले जाण। उशीर होईल म्हणूनी ।।५०।। हा प्रकार चार पाच दिवस।

चालला कचेरीस जाते वेळेस । परी पुन्हा करून पोषाखास । जावे अंतरी राग नसोनी ।।५१।। हे पाहून दुर्जन । मनी ओशाळले पूर्ण । येवूनिया धरिती चरण । अपराध क्षमा करा म्हणोनि ।।५२।। वर्तोनि शांत प्रकार । फिरविले दुष्टांचे अंतर । क्षमा करूनी बोधिती साचार । रामनाम- स्मरण करावे ।।५३।। सिद्धस्थितीचा प्रकार । सिद्धरूपी स्वरूपाकार । सिद्धस्वरूप साक्षात्कार । अन्य कोणी दाविना ।।५४।। एकदा एक पंडित थोर । कर्नाटक प्रांतींचे साचार । फिरती भरतखंड समग्र । की स्वरूप-साक्षात्कार साधावा ।।५५।। येणे परी फिरता निरंतर । कोठेही मार्ग सांपडेना साचार । उदास जाहले अंतर । समाधान काही लाधेना ।।५६।। मग येता येता सांगलीस । आले ऐकोनी कीर्तीस । की साधुवर्य कोटणीस । यांचे दर्शना यावे म्हणवोनी ।।५७।। आले तो चालिले कीर्तन । येवुनि बैसले करावया श्रवण । तो दाविला साक्षात्कार पूर्ण । सिद्धस्वरूपाचा अंतरी ।।५८।। मना होवुनी समाधान । पंडिते सद्गुरुपाय धरिले जाण । बोलिले कृतार्थ केले जाण । न मिळे ते येथे मिळाले ।।५९।। तैसेचि अण्णासाहेब कुकंदवाडकर । कीर्तन ऐकता इच्छिती गणेश- साक्षात्कार । तो त्यांना कीर्तनात सर्वत्र । सद्गुरुंनी श्रीसिद्धगजानन स्वरूप दाखविले ।।६०।।

सिद्धांचे सिद्ध अन्न । जयास बोलती नाम जाण । त्याची लूट केली जाण । सकळा कारणे सर्वदा ।।६१।। जे असे स्वतःसिद्ध । जेथे नाही भेदाभेद । ऐशा बोलण्याचा बोध । केला सकळा कारणे ।।६२।। असो सिद्ध गुरूंचा कृपा- कर । पडेल जरी मस्तकावर । तरी आपुले अंतरीचे साधन थोर । प्रगटविती त्यांचे अंतरी ।।६३।। आपुले अंतरीचे देती । याची आली आम्हा प्रचीती । राम बाळपणापासूनी प्रेम धरुनी चित्ती । कृपा- करे कीर्तन करू लागला ।।६४।। सिद्ध सद्गुरूंचे अंतर । पाहता दिसे साक्षात्कार । त्या साक्षात्काराचा प्रकार । पुढील अध्यायी वर्णिन ।।६५।। ते कथा गोड बहुत । मनी घेता निवेल चित्त । भेटी देईल भगवंत । समाधान होईल ।।६६।।

स्वस्तिश्री हनुमद्-गुरुचरित्र-बोधसार । सिद्धस्थिती वर्णन सुमन सुंदर । अर्पोनिया श्रीगुरुचरणावर । दशमाध्याय संपविला ।।

इतिश्री हनुमद्-गुरुचरित्र- बोधसारे दशमोऽध्यायः

# एकादश अध्याय

।। श्रीगणेशायनमः ।।

जय जयाजी सद्गुरुराणा । नमन करितसे तव चरणा । कृपा करोनिया जाणा । मनीचे आर्त पुरवावे ।।१।। मनात धरिला चरित्राचा हेत । सिद्धावस्थेत जो साक्षात्कार होत । त्याचे वर्णन करवावे निश्चित । आपुले कृपे दयाळा ।।२।। आपली कृपा होईल जर । तरीच हे घडेल साचार । ऐसे ऐकता सद्गुरुवर । मस्तकी हस्त ठेवोनी बोलती ।।३।। माझे हृदयी जे आले । तेचि तुझे हृदयी प्रगटले । आता वर्णन करी गा भले । साक्षात्कार स्वरुप ।।४।। ऐसा मिळता सद्गुरुवर । मनी आनंद दाटला थोर । श्रोते हो ऐका चतुर । पुढील चरित्र स्वानंदे ।।५।। सिद्ध-स्थितीमाजी सद्गुरु । असोनी चालविती व्यवहारु । मन जयांचे आनंदाकारु । असे स्वरुपी सर्वदा ।।६।। स्वरुपी जडून राहिले । स्वरुपी स्वरुपाकार झाले । स्वरुप- साक्षात्कारी भले । पाहाती सदा सर्वदा ।।७।। स्वयंप्रकाश नीळ बिंदु । दंड प्रगटे आनंद कंदु । चित्ता चैतन्य-प्रसादु । अखंडित मिळतसे ।।८।। चित्त होऊनी आनंदाकार । मुक्त मत्स्य वर्तुळाकार । वदनी धरोनी मुक्तहार । पाहती सदा स्वानंदे ।।९।। ते ठायीची आनंद स्थिती । कोणा वर्णवेल निगुती । गुरुपुत्राविण हे स्थिती ।

अनुभवा कैसी येईल ।।१०।। अनंत तारक प्रगटती साचार । बाण सुटती अपरंपार । पूर्ण चंद्र वर्तुळाकार । लाघवी साक्षात्कार दाविती ।।११।। शुभ्रप्रभा नीळ पीतरंग । व्योमी शोभती सुरंग । चित्त मन होऊनी एक अंग । स्वरूपी दंग होताती ।।१२।। पडे गडद अंधःकार । तात्काळ प्रकाश प्रगटे थोर । चंद्र सूर्य नसता हा प्रकार । येत असे अनुभवा ।।१३।। मुक्त झालरीचा भार । दिसे सर्वत्र सुमनाकार । मधुर घोष नाद गंभीर । अनुभवा अनुभव येत असे ।।१४।। बिंदुरूपे रघुवीर । वाढोनी व्यापितो सर्व विस्तार । नयन भुकेले साचार । सदा सर्वदा ज्यासाठीं ।।१५।। ऐसा साक्षात्कारी सदा रत । येथे कायसी दुजी मात । परी व्यवहार चालवोनी सुचित । सूचक गोष्टी सांगती ।।१६।। संतांचे सूचक बोल । अनुभवाचे असती खोल । जेव्हा येईल अनुभव- वेळ । तेव्हा उमगोन येतसे ।।१७।। एकदा मी व वडील सद्गुरुंसी । गेलो बोलावण्या भोजनासी । की या कारणे घरी येऊनी आम्हासी । कृपा-प्रसाद द्यावा ह्मणोनी ।।१८।। ऐसी विनंती करिता साचार । काय बोलिले सद्गुरुवर । भोजनाचा आग्रह थोर । कशासि करिता म्हणोनी ।।१९।। आपण आपले ह्मणितले । त्याचे पाहिजे कोड पुरविले । ह्मणोनिया पाय धरिले । तेव्हा बोलिले

दयाळ ।।२०।। उद्या येतो बरे पाही। चिंता न करावी काही। आनंदित होऊनी पाही। आम्ही स्वगृही पातलो ।।२१।। दुसरे दिवशी येऊनी घरासी। भोजन करुनी धन्य केले आम्हासी। काही वेळ आनंदेसी। होते सद्गुरु बैसले ।।२२।। मग सहजचि बोलिले। मजलागी विचारिले। शाळा सुटते कोणे वेळे। मी पाचास ऐसे बोलिलो ।।२३।। ऐकोनि बोलिले सद्गुरु दयाळ। ही फार छान आहे वेळ। परी त्या बोलण्याची कळ। नाही कळली त्या वेळी ।।२४।। मग जाण्या निघाले घरी सत्वर। आम्ही केला नमस्कार। ऐसे थोर सद्गुरुवर। इच्छा पूर्ण केलीसे ।।२५।। पुढे श्रीसद्गुरुंनी करोनी कृपेस। शके आठराशे पंचेचाळीस। माघ वद्य प्रतिपदेस। अखंड कीर्तन-स्फूर्ती दिधली ।।२६।। ते दिवशी सायंकाळी पाच वाजणेस। सुरुवात केली कीर्तनास। पुढे रोज त्या वेळेस। अखंड कीर्तन करु लागलो ।।२७।। आपुला ऐसे म्हणवोनी। मज अखंड कीर्तन दिधले ज्यानी। थोर श्रीसद्गुरुंची करणी। किती म्हणोनी वर्णावी ।।२८।। हे पूर्वीच जाणोनी सद्गुरुवर। पाचाची वेळ छान फार। ऐसे सूचक बोलिले साचार। त्याचा अनुभव आलासे ।।२९।। तसेच एकदा संध्या- मठासी। सद्गुरु आले होते कीर्तनासी। कीर्तन करोनी

जाते वेळेसी । काय बोलिले ते ऐका ।।३०।। ही जागा आहे छान । राहणेस उत्तम ठिकाण । या बोलण्याचा उलगडा जाण । पुढे सकळासी जाहलासे ।।३१।। सद्गुरु बोलीले छान ठिकाण । तेचि विश्रांतिचे स्थान । कृष्णातीरी परम पावन । गंगाधरराव दीक्षित सेवा करिताती ।।३२।। नित्य भजन पूजन । अखंड चालविती अनुदिन । ही जागा आहे छान । त्याचा अनुभव ऐसा आलासे ।।३३।। गंगाधररावानी प्रयत्न करून । दहनास जागा मेळविली जाण । म्हणोनी विश्रांति-स्थानाचे दर्शन । सकळा कारणे होत असे ।।३४।। तैसेचि नेहमी सद्गुरुवर । सूचक बोलती साचार । माझा परमार्थ- विस्तार । बाबू चालवील अखंड म्हणोनी ।।३५।। त्या बोलण्याची खूण । तेव्हा कोणास न कळेची जाण । परी आता प्रत्यक्ष प्रमाण । अनुभवास येतसे ।।३६।। श्रीसद्गुरुंचा परमार्थ- विस्तार । मागे चालविला अत्यंत थोर । त्यांच्या ऐसे वर्तोनि साचार । अहर्निशी सद्गुरु- सेवा करिताती ।।३७।। श्रीसद्गुरु वडिलांचे व्रत । चालविती अखंडित । नित्य नेमे रात्री कीर्तन करित । वडिलांचे समान सप्रेमे ।।३८।। त्यांचाच करिती आचार । त्यांचाच करिती विचार । ऐसे बाबूराव (श्रीरघुनाथ) कोटणीस थोर । सद्गुरु- इच्छे वर्तती ।।३९।।

अध्याय अकरावा

त्यांची परमार्थ- धडाडी थोर। पाहोनी मना आनंद फार। सद्गुरुंचे स्थानी साचार। आम्हा सकळांसी जाहले ।।४०।। ऐसे सद्गुरुंचे महिमान। कोणा वर्णन करवेल संपूर्ण। म्हणोनीया पायी लीन। होऊनी वंदन करीतसे ।।४१।। ऐसे सद्गुरु साक्षात्कारी। काय वर्णू त्यांची थोरी। सगुण साक्षात्कारा भीतरी। निर्गुणात वस्ती करितातीं ।।४२।। सगुण आणि निर्गुण। तूप थिजले पातळ जाण। तैसे नाही दुजे- पण। सगुण निर्गुणात कदापि ।।४३।। सगुण निर्गुण एक होत। तो ठाय शोधिला निवांत। कीर्तनी वृंदावन डोलवित। ऐसे महिमान जयांचे ।।४४।। ऐशा साक्षात्कारी रमत रमत। नाम- संकीर्तनी होवोनी रत। गृहस्थाश्रम गुरु- कृपे सुसंगत। संपवोनी मूळ ठाया गेले ।।४५।। मूळ ठाय तो निर्गुण। जो का आनंदमय पूर्ण। जेथे बोलणे अबोलणे जाण। दोन्ही विरोनी राहिले ।।४६।। सद्गुरु निज ठाया गेले। निर्गुण स्वरुपाकार झाले। प्रगट होते ते गुप्त राहिले। आत्मरूपी स्वरुपाकार होवोनी ।।४७।। शके आठराशे पंचेचाळीस। पौष वद्य षष्ठीस। सायंकाळी पाचास। स्वरूपी स्वरुपाकार जाहले ।।४८।। तयांचे चरणी नमस्कार। वारंवार निरंतर। मनोभावेसी साचार। सप्रेम- युक्त अखंड करीतसे ।।४९।। त्यांचे मागे दोन



अध्याय अकरावा

कन्या चार पुत्र जाण । वर्तती त्यांचा लौकिक राखून । आप आपला व्यवसाय करून । एकजुटीने राहती ।।५०।। संत सद्गुरु गेले नाहीत जाण । राहती स्वरूपी स्वरूपाकार होऊन । या बोलण्याची खूण । पुढील अध्यायी सांगेन ।।५१।। ते कथा अत्यंत सुरस । ऐकता न उरती दोष । जेणे प्रसन्नता येऊनी मनास । चित्त गुरुपदी जडेल ।।५२।।

स्वस्तिश्री हनुमद्-गुरुचरित्र-बोधसार । साक्षात्कार स्थिती वर्णन सुमन सुंदर । अर्पोनिया श्रीगुरुचरणावर । एकादशाध्याय संपविला ।।

इतिश्री हनुमद्-गुरुचरित्र- बोधसारे एकादशोऽध्यायः

अ ध्या य अ क रा वा

# व्दादश अध्याय

।। श्रीगणेशायनमः ।।

जय जयाजी सद्गुरुराजा । तव चरणी नमन करितसे वोजा । मनीचा असे हेतू माझा । पुढील चरित्र वर्णवी ।।१।। सर्व कर्तृत्व तुझेनी । ऐसे बोले वेदवाणी । म्हणोनी आलो असे चरणी । कृपा करी गा दयाळा ।।२।। तव सद्गुरु म्हणती आता । वर्णन करी तुझी स्वानुभव- कथा । तो माझा अनुभव आता । श्रीसद्गुरु- आज्ञेने सांगतसे ।।३।। होऊनी चित्त आनंदित । गुरुचरणी मस्तक ठेवित । श्रोते हो ऐका मात । सद्गुरु स्वरूपाकार झाले ।।४।। स्वरूपी स्वरूपाकार झाले । ते साधुसंत नाही गेले । निर्गुणरूपे जगदाकार झाले । जगी व्यापूनी राहती ।।५।। संत सद्गुरु आले गेले । हे तो आपुले बोलणे झाले । परी ते अखंडित राहिले । भक्तजना कारणे ।।६।। भक्तांसाठी अवतरत । अखंड भक्तकार्य करत । शेवटी साधावया भक्तांचे हित । निर्गुण स्वरूपे राहती ।।७।। जरी आपुला भाव असेल । तरी प्रगट होऊनी भेटतील । अंतरी संशय असेल खोल । तो काढोनी टाकिती ।।८।। सद्गुरुंनी देह ठेविल्यावरी । रात्री बोलत असता अवधारी । माघ वद्य तृतीया निर्धारी । शके अठराशे पंचेचाळीस ।।९।। अनंतराव म्हैसकर । मज म्हणाले ऐकिला

का प्रकार। तात्यांनी देह ठेविल्यावर। काशीत कीर्तन केलेसे ॥१०॥ मनी आले की देह ठेविल्यावरी। कीर्तन होईल कोणे प्रकारी। कोणीतरी काही तरी। असेल ऐकून सांगितले ॥११॥ ऐसे संशयित मन। माझे झाले असे जाण। मनात म्हटले हा संशय कोण। जाण कैसा घालवील ॥१२॥ बराच वेळ बोलिल्यावरी। रात्री बाराचा सुमार निर्धारी। त्यांचे खोलीतूनी उठोनी सत्वरी। घरी देवाजवळी आलोसे ॥१३॥ माघ वद्य प्रतिपदे पासून। ते माघ वद्य दशमीपर्यंत जाण। दासबोध संपूर्ण वाचन। माझा नेम नेहमीचा ॥१४॥ त्याप्रमाणे देवापाशी। बैसलो दासबोध- वाचनासी। तो एक दोन मिनिटांत पहा कैसी। नवल गोष्ट जाहली ॥१५॥ प्रगट होऊनी सद्गुरुवर। उभे राहिले मज- समोर। सहज पाहू लागलो वर। तो प्रत्यक्ष तात्या दिसले ॥१६॥ पुनः खाली पाहून। श्रीदासबोध वाचू लागलो जाण। पुनः वर पाहता जाण। उभे प्रत्यक्ष तैसेचि ॥१७॥ मनात ऐसे वाटले पाही। तेचि बोलत होतो काही। त्याचा भास तरी नाही। हा होत ॥१८॥ ऐसे मनात येऊनी गेले। पुनः पाहताची भले। तो तैसेचि उभे राहिले। प्रत्यक्ष दिसती मजलागी ॥१९॥ मन झाले चकित। अंग झाले रोमांचित। तैसाचि उठोनि त्वरित। बसाया आसन घातले ॥२०॥ आसन घालिता

सत्वर। बैसले श्रीसद्गुरु आसनावर। दासबोध- वाचन सत्वर। पुढे वाचू लागलो ॥२१॥ वाचणे संपेपर्यंत। बैसले होते ऐकत। माझे मन संशयातीत। होते आता जाहले ॥२२॥ या दिवसाचे आधी दोन दिवस। म्हणजे माघ वद्य प्रतिपदेस। आरंभ केला होता कीर्तनास। नित्यनेमे करावे म्हणूनी ॥२३॥ परी मनात ऐसे येई। हे माझे हातूनी घडेल कायी। कृपा करील सद्गुरुमाई। तरीच हे घडो येईल ॥२४॥ मग पोथी खाली ठेवून। सद्गुरुंचे पाय धरिले जाण। मस्तक पायावरी ठेवून। बोलिलो कृपा करावी ॥२५॥ कीर्तन करवावे नित्य। ऐसा हेतु धरुनी मनात। आरंभ केला असे सत्य। सद्गुरुरायें इच्छा पूर्ण करावी ॥२६॥ आपण जैसे चालविले व्रत। तैसे माझे हातूनी चालवावे निश्चित। आपण सर्व करणार समर्थ। ऐसे बोलूनी पाय धरोनि राहिलो ॥२७॥ प्रसन्न झाले सद्गुरुवर। मम मस्तकी ठेविले दोन्ही कर। मजला उठवोनी सत्वर। दृष्टीस दृष्टी दिधलीसे ॥२८॥ कृपा- दृष्टीने पाहून। मजला दिधली संकेत खूण। तुझे हातूनी कीर्तन- भक्ती जाण। मजप्रमाणे अखंड चालेल ॥२९॥ ऐसी नेत्र- संकेत खूण। होवुनिया प्रसन्न- वदन। श्रीसद्गुरुंनी अनुज्ञा जाण। नित्यनेमे कीर्तनासी दिधली ॥३०॥ ऐसा देऊनी कृपा- वर। सद्गुरु अदृश्य जाहले सत्वर। ज्यांचे कृपे मम कीर्तन निरंतर।

असे नित्यनेमे चालिले ।।३१।। शके अठराशे पंचेचाळीस जाण । माघ वद्य प्रतिपदेपासून । आज बारा वर्षे अकरा महिने पूर्ण । सेवा सद्गुरूंनी घेतली ।।३२।। पुढेही अशीच निरंतर । सेवा करूनी घेणार सद्गुरु धुरंधर । घ्यावी करवुनी निर्धार । हेचि सद्गुरूंसी मागतसे ।।३३।। राम आपुले कृपेचे बाळ । त्याचेही मनी कीर्तनतळमळ । सेवा करवुनी घ्यावी सकळ । आपुले कृपे करूनी ।।३४।। असों ऐसे सद्गुरुवर । अखंड असती अजरामर । याचा अनुभव देऊनी साचार । संशय काढुनी टाकिला ।।३५।। तैसेचि श्रीसद्गुरुनाथ जगदीश । पूर्ण करिती बाळकाची आस । ऐसे मज प्रत्ययास । आले असे कीर्तनी ।।३६।। श्रीसद्गुरूंचे छाया-चित्र । ठेवुनिया देव्हाऱ्यात । त्याचे पुढे प्रेम- भरित । कीर्तन- सेवा करीतसे ।।३७।। माझे मनीची ऐसी आस । मनीच ठेविली होती बहुत दिवस । की सद्गुरु- पादुका आपणास । कैशा बरे मिळतील ।।३८।। तव सद्गुरु- पादुका सत्वरी । आपोआप माझिये घरी । तीन वरूषे लोटिल्या वरी । गुरुपौर्णिमेसी पातल्या ।।३९।। कीर्तनी श्रीकरासी हनुमंत । भेटले म्हणुनी होतो सांगत । तो श्रीसद्गुरु समर्थ हनुमंत । पादुका पुढती दिसों आल्या ।।४०।। सद्गुरूंच्या प्रेरणे करूनी । असती कोणी ठेविल्या आणुनी । ही तो गोष्ट देखिली सर्वांनी । आनंद

जाहला सकळांसी ॥४१॥ येथोनी साडे तीन कोटींचे पुरश्चरणास । आरंभ केला धरोनी निश्चयास । संपूर्ण होता नवल विशेष । ते दिनी साक्षात्कार आला असे ॥४२॥ समर्थ हातीचा लहान मारुती जाणी । जो प्रसाद मेळविला श्रीवेणाबाईंनी । तो मिरज मठाधिपती यांचे कडोनी । बाबुरावजींनी अचानक आणोनी दिलासे ॥४३॥ कृपा- मूर्ती सद्गुरुवर । संकटे करोनिया दूर । कैसे रक्षिती साचार । याचा अनुभव सांगतो ॥४४॥ असेच एकदा महिनाभर । बोलता येईना मोठ्याने साचार । कीर्तनातील उच्चार । जवळच्यासही ऐकू येईना ॥४५॥ मन जाहले चिंतातूर । काहीच चालेना उपचार । आता काय होणार प्रकार । कीर्तन कैसे चालेल ॥४६॥ मग एकदा एकादशीचा दिन । कीर्तनात प्रार्थिले श्रीसद्गुरु मी जाण । आपण पाठीशी असता जाण । ही स्थिती कैसी आलीसे ॥४७॥ आपुली इच्छा नसेल जर । बोलणे अजिबात बंद करा सत्वर । म्हणोनी मने प्रार्थोनी सत्वर । मनेचि चरणी मस्तक ठेविले ॥४८॥ सद्गुरुंनी केला चमत्कार । आवाज जाहला मोठा सत्वर । कीर्तन केले एक प्रहर । आवाज चांगला जाहला ॥४९॥ ऐसे सद्गुरु कृपा- मूर्ती । कृपा करोनि रक्षिती । किती वर्णन करु महती । सद्गुरुंच्या कृपेची ॥५०॥ असो एकदा सद्गुरुवर । स्वप्नी प्रगटोनी साचार । सौ. इंदिराबाई केळकर ।

घे प्रसाद ऐसे बोलिले ।।५१।। आशीर्वाद देऊनी जाणे। हालवा दिधला पाच दाणे। नारदांचा प्रसाद म्हणून। सद्गुरुराज बोलिले ।।५२।। नारदांचा प्रसाद खूण। घरी नित्य होऊ लागले कीर्तन। ऐसे गुरुकृपेचे लक्षण। किती म्हणोनी वर्णावे ।।५३।। सद्गुरु असता देहधारी। अथवा देह ठेविल्यावरी। भक्तारक्षिती निर्धारी। सदा सर्वदा सप्रेमे ।।५४।। असो श्रीसद्गुरु महिमान। वाचेसि वर्णवेना जाण। म्हणोनी पदी होऊनिया लीन। चरणी मस्तक ठेवितसे ।।५५।। गोड अध्याय शेवटीचा। पुढे वर्णन करीन साचा। अनुभव घेता तयाचा। देव- देव भेटेल ।।५६।।

स्वस्तिश्री हनुमद्-गुरुचरित्र-बोधसार। स्वानुभव- वर्णन सुमन सुंदर। अर्पोनिया श्रीगुरुचरणावर। व्दादशाध्याय संपविला ।।

इतिश्री हनुमद्-गुरुचरित्र- बोधसारे व्दादशोऽध्यायः

# त्रयोदश अध्याय



।। श्रीगणेशायनमः ।।

जय जयाजी सद्गुरु दातार । चरणी विनवितो वारंवार । वर्णिले संपूर्ण श्रीहनुमद्गुरुचरित्रबोध-सार । माझेनि मुखे कृपाळा ।।१।। तैसेची आपण कृपा- मूर्ती । सांगावी या ग्रंथाची फलश्रुती । जेणे प्राणिमात्र उद्धरती । आचरिता सद्भावेसी ।।२।। तंव प्रसन्न होऊन सद्गुरुवर । बोलती सांगेन ते लिहावे साचार । नवल सद्गुरु- सामर्थ्य थोर । मम श्रवणी शब्द उमटविती ।।३।। कानी श्रीसद्गुरुंनी सांगितले । तेचि आता वर्णिन भले । श्रोतेहो आयका चांगले । एकाग्र चित्त होऊनी ।।४।। एक संवत्सर नित्य शनिवारी जाण । मध्यरात्री स्नाने शुचिर्भूत होऊन । सद्भावे संपूर्ण चरित्र- पठण । करिता अंतर- शुद्धि होईल ।।५।। येणेचि रीति एक तपपर्यंत । जरी कोणी आचरील नियमित । तरी त्यासी भेटेल भगवंत । साक्षात्कार स्वरुपे ।।६।। हे न घडेल जरी जाण । तरी स्नाने शुचिर्भूत होऊन । दुपारी भोजनापूर्वी जाण । एक अध्याय नेमे पठण करावा ।।७।। ऐसे आचरिता सद्भावेसी । दैन्य-दुःख नुरेल त्यासी । ये विषयी संशय मानसी । किमपीही न धरावा ।।८।। संशय धरील जो नर । तो जाणावा अभागी पामर । स्वये बोलिले शारंगधर ।

संशयात्मा विनश्यती म्हणोनि ।।९।। कानी श्रीसद्गुरु बोलिले । तेचि सकळा सांगितले । जे जे आचरतील भले । त्यांचे कल्याण होईल ।।१०।। ऐसा सद्गुरु महिमा । वर्णवेना न कळे सीमा । वंदोनिया पादपद्मा । चरणी मस्तक ठेवितसे ।।११।। चरित्र लिहावे हा विचार । माझे वडिलांनी सांगितला साचार । अनंत गंगाधर केळकर । ऐसे नाम तयांचे ।।१२।। परी तो विचार तैसाचि राहिला । आता त्याचा योग आला । सद्गुरु- समाधि कालापासून वहिला । तेरा वर्षांनी लिहिण्याचा ।।१३।। श्रीसद्गुरुंनी प्रेरणा केली । विचार- पूर्तता होण्याची वेळ आली । तेरा दिवसात सद्गुरुंनी करविली । चरित्र- रचना संपूर्ण ।।१४।। चरित्र संपविले तो दिन । शके आठराशे अठ्ठावन । पौष शुद्ध चतुर्थी मकर संक्रमण । ते दिवशी संपूर्ण जाहले ।।१५।। वडिलांचे मनातील विचार । सद्गुरु- कृपे सफल झाला थोर । परी ते ऐकण्या नाहीत साचार । कैलासवासी जाहले ।।१६।। नमन असो त्या पितयासी । तैसेच दोघीही माता कैलासवासी । त्यांची नावे राधा व लक्ष्मी ऐसी । तयांचे चरणी नमन असो ।।१७।। कुळस्वामी श्रीरामेश्वर । ज्यांचा सर्वस्वे आम्हासी आधार । मी गोविंद अनंत केळकर । त्यांचे चरणी मस्तक ठेवितसे ।।१८।। तैसीच श्रीकुळस्वामिणी ।

आणि श्रीसीतारामांचे चरणी । साष्टांग नमस्कार करुनी । ग्रंथ रचना संपविली ।।१९।। निंबर्गी- पीठस्थ श्रीसद्गुरु नागाप्पाण्णा । वंदितसे त्यांच्या चरणा । तैसेचि चिमडपीठस्थ श्रीसद्गुरु नारायणा । नमस्कार करितसे ।।२०।। श्रीराम जयराम जयजय राम । तेरा अक्षरे श्रेष्ठ परम । तैसेच तेरा अध्याय सर्वोत्तम । या चरित्र ग्रंथाचे ।।२१।। असो ऐसा कळस अध्याय । संपवोनि नमितो श्रीसद्गुरुपाय । त्यांचे चरित्र गंगातीय । त्यांचेच चरणी समर्पितो ।।२२।।

स्वस्तिश्री हनुमद्-गुरुचरित्र- बोधसार । फलश्रृति- वर्णन सुमन सुंदर । अर्पितसे श्रीगुरुचरणावर । त्रयोदशाध्याय गोड हा ।।

इतिश्री हनुमद्- गुरुचरित्र- बोधसारे त्रयोदशोऽध्यायः

।। राजाधिराज श्रीसद्गुरुनाथ महाराज की जय ।।

## पद

मी दीन तुझे लेकरु । काय गे करु ।।धृ.।। भवाटवीं ही भ्रमता श्रमलों । सन्मार्गाते मोहे मुकलों । येऊनी कंटकरानी पडलों । भय मज थोरु ।।मी. ।।१।। धावत धावत येई मायें । अंत पहातेसी गे कायें । तुजविण जिव हा जावों पाहे । प्रसंग घोरु ।।मी. ।।२।। तव मनी प्रेमा भरते येवो । तव- पद- दर्शन सत्वर होवो । मम- मन- भीती समूळ जावो । तुज मम भारु ।।मी. ।।३।। हनुमंते गे माये सुख दे । वोसंगावरि प्रेम सुखा दे । रघुनाथाची किंव तुज येवों दे । करि सांभाळू ।।मी. ।४।।

७८

श्रीदादामहाराज कोटणीस

## आर्या

अज्ञ जना ताराया संता येणे असे हरी वदले । सद्य स्थिती ही पाहता सांप्रत तैसे महंत मज गमले ।।१।। गुरु- अंजनीच दृष्टी स्थिर करताना घडे हा अवतार । हनुमंत नाम साजे जन उद्धरण्या आलेचि साचार ।।२।। विव्दत्ता बहु असुनी वर्तन साधे किती तरी वानू । भूत दया अति तरती ज्ञानी शोभती जसा नभी भानू ।।३।। गुरुसेवा-कृपाने हीना दीना प्रमोद हा करिती । छत्तिस वर्षे ऐसे कीर्तन चाले गुरुकृपे वरती ।।४।। कीर्तनी

उभेचि राहता गुरुमूर्ती बोलवी असे वाटे । ऐशा स्फुरण- प्रकाशे कीर्तनी रंगची नवा नवा दाटे ।।५।। सर्वां संताची ती वाक्ये दावुनी दृढ मती करिती । सूक्ष्मार्था स्पष्ट करुनी देहावरी त्या आणोनि दाविती ।।६।। कीर्तन- त्रिवेणी- संगमी ज्ञात्यांना घालिती सदा स्नान । धन्य ते त्यांतही जन ते नाम मिश्रित जयां सुधापान ।।७।। शक अठराशे सत्तिशी विभूती मासीच कृष्ण षष्ठीशी । सोमवार शुभ पाहूनी गुरुनाथे घातलेचि पाठीशी ।।८।। हीन दीन मी असता गुरुराये मज कृपेचि करि धरिले । भव्यव्याधी ही निरसुनी अनंताला अनंतचि केले ।।९।।

अनंत गंगाधर केळकर ७९

पद्य


(चाल : स्वकुल- तारक सुता; राग : भीमपलासी)

नमन सद्गुरुपदा । सुखदा ।। फिरुनी फिरुनी करिन शतदा ।।धृ.।।

हनुमंताच्या कृपाप्रसादा-साठी चढलो भजकपदा ।।१।।

अनन्य भावे चिंतन करितचि, साधुदास- कवि घे मोदा ।।२।।

साधुदास



श्री ज्ञानेश्वर महाराज

## पद

जा जा जा मनुजा गुरुला शरण जा ।।धृ.।। या संसारी सुख हे नाही एक सुख गुरु- पद- रजा। धन सुत दारा दुःखाकारण या सर्वा मनि देइ रजा ।।१।। मोहे भ्रमसी उगाच फिरसी बऱ्या वाटती बहु गमजा। बऱ्या वाटती खऱ्या नव्हति त्या एकसुख गुरुपदि उमजा ।।२।। गुरुनामी तू रंगुनि अवघा मायाममता करी वजा। वजा करीता सजा नसोची गोविंद सांगणे निज गुजा ।।३।।

## पद २ रे

बा फसवूं नको तू या श्रीरंगा रंग तयाचा समजुनि घे। रंगिं रंगता काय उणे मग तुझा तुला तू समजुनि घे ।।धृ।। ज्याने केले ज्याने दिधले त्याते विसरुनी या कैसे। चालेल तुझे या जगामधीं त्याचे चरणा धरुनी बसे ।।१।। नामस्मरणे त्यासी स्मरता रामरंगी मन हे रंगे। गोविंदाचे भव- भय भंगे त्यासी कथिले श्रीरंगे ।।२।।

पद ३ रे

ते रूप पाही बरे। मनुजा ते रूप पाही बरे ।।धृ।। ज्या रूपाचे दर्शनि होता जगदाभास नुरे। सर्व ईषणा तृप्त होऊनी मन हे आनंदी विरे ।।१।। वर वर पाहुनी काय पाहसी परस्तावाची उरे। हरिरूप पाहुनी मुरवी वानीता हृदयी राम भरे ।।२।। तेज लखलखीत भोंवती मध्ये बिंदु सुनीळ सरे। त्यामध्ये श्रीराम विराजित निरखुनी पाही बरे ।।३।। हनुमंताच्या कृपा-कटाक्षें दिसले स्वरूप खरे। गोविंद ह्मणे अंतरी जाऊनी उन्मनीत विवरे ।।४।।

श्रीमामा महाराज केळकर



पद

श्रीगुरुराया सद्गुरुराया राजा हनुमंता। दर्शन देई व्दारी तिष्ठलों दावि भक्ति पंथा ।।१।। दर्शन नाही अजुनी घडिले म्हणुनी भेटी दयाळा। तुझे स्वरूप मज पाहूं दे रे अनादि गुण- नाथा ।।२।। चित्त धावते तुझ्याकडे रे तूचि तारी मज आता। तुझ्याविणे मज क्षणही गमेना पदी ठेवितो माथा ।।३।। राम भुकेला तुझ्या दर्शना देई नाम कृपाळा। तुझे बाळ हे तुझ्याकडे रे धाव घेई आता ।।४।।



श्रीराम

## अभंग

चिन्मय वृक्षांचे रोपडे लावियले जें रोकडे ।।१।।
धन्य नारायणराव देखियेली स्वरूप- ठेव ।।२।।
साधुरायें निगा केली धन्य धन्य ती माउली ।।३।।
रामरायें वाढविले रामरूप होऊनी ठेले ।।४।।
हनुमंते धरूनी प्रेमा वाढविलासे महिमा ।।५।।
धन्य रघुनाथ गोविंद भोगिताती स्वरूपानंद ।।६।।
दासराम लीन झाला सुख सोहळा देखिला ।।७।।

दासराम

## पद

गुरु हनुमंता । मति द्या गुण- गाना ।।धृ.।। कोटणीस कुळीं जन्म घेउनी । वंश उद्धरिला, ज्यांनी ।।१।। बाळपणी बहु कष्ट सोसुनी । सद्‌गुरु वोळखीला, ज्यांनी ।।२।। गुरुकृपा मग संपादोनी । साधनी रंगविला, देह ।।३।। छत्तीस वर्षे कीर्तनी रंगुनी । गाजविला डंका, त्रिभुवनी ।।४।। रामनामी रंगली वाणी । आत्माराम प्रगटविला, हृदयीं ।।५।। दास गणेश हनुमंतचरणी । मागतो राम ठेवा, द्यावा ।।६।।

श्री.गणपतराव कानिटकर

मना राम पाया कदा तू न सोडी। मना राम- नामी धरी नित्य गोडी।
मना सद्गुरु राम प्रेमे भजावा। मना राम तो अंतरी साठवावा ।।९।।

आरती

सद्गुरु भक्तिचा डंका गाजवुनी।
कीर्तनी डोलविला गुरु राम ज्यांनी।
संसारी दाविला सदाचार करुनी।
गुरुरुपी तन्मय झाले काया संहरुनी ।।१।।
जय देव जय देव जय गुरु हनुमंता।
तारी जड जीवाया श्रीलक्ष्मीकांता। जय देव जय देव ।।धृ.।।
राम लीन झाला धन्य तुझे चरणी।
ओवाळी आरती तन मन वाहूनी।
माय बाप तुम्ही असता कैंची दिनवाणी।
उरेल माझे पाशी सांगा देव धणी ।।२।।

।। श्री हनुमान गुरु की जय ।।